
रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १८ ◆ अंक २५६
www.ramprahar.com
◆ रविवार, ५ एप्रिल २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

अंतरंग

मटका जुगार अड्ड्यावर धाड; एक जण ताब्यात/२
रविप्रहरमध्ये विविध विषयांवरील लेख/४
वॉटर पोलो स्पर्धेत नागोठणे स्कूलला सुवर्णपदक/८

## इंधनासंदर्भात सरकारचे देशातील जनतेला आवाहन



**नवी दिल्ली :** जागतिक तणावाच्या पार्श्वभूमीवर देशात पेट्रोल, डिझेल आणि एलपीजीच्या उपलब्धतेबाबत निर्माण झालेल्या चिंतेदरम्यान केंद्र सरकारने नागरिकांना महत्त्वाचे आवाहन केले आहे. देशात इंधनाचा पुरवठा पुरेसा असून घाबरून खरेदी (पॅनिक बायिंग) करण्याची कोणतीही गरज नाही. पेट्रोल, डिझेल आणि स्वयंपाकासाठी वापरल्या जाणाऱ्या गॅसचा पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी विशेष उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत, असे पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाने म्हटले आहे. दरम्यान, ग्रीन सानवी नावाचे एक भारतीय जहाज होर्मूझ सामुद्रधुनीमधून पार झाले असून एलपीजी घेऊन भारताकडे निघाले आहे. या जहाजामध्ये तब्बल ४६,६५० टन एवढा गॅस आहे. युद्धकाळात होर्मूझच्या सामुद्रधुनीमधून सुरक्षितरित्या निघालेले हे भारताचे सातवे जहाज आहे.

# शैक्षणिक पद्धतीला नवी दिशा आवश्यक : मुख्यमंत्री फडणवीस





**नागपूर : प्रतिनिधी**

वैश्विक ज्ञानाचे भारतीयीकरण व भारतीय ज्ञानाचे वैश्विकरण करणे, हेच नव्या शैक्षणिक धोरणाचे प्रमुख उद्दिष्ट्य आहे. केवळ ऐतिहासिक बाबींचा गौरवपूर्ण उल्लेख करून आपण महान होणार नाही, तर यासह वर्तमान आणि भविष्याची वैश्विक आव्हाने लक्षात घेऊन त्यानुसार शैक्षणिक पद्धतीला दिशा द्यावी लागेल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची शनिवारी (दि.४) येथे केले.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, गोंडवाना विद्यापीठ, विश्वेश्वरैया राष्ट्रीय अभियांत्रिकी संस्था, आयआयएम नागपूर आणि शिक्षा संस्कृती उत्थान न्यास नवी दिल्ली या संस्थांच्या संयुक्त विद्यमाने व्हीएनआयटी येथे महाराष्ट्र ज्ञान सभा-२०२६ : विकसित महाराष्ट्रासाठी शिक्षण या राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटन सत्राचे विशेष अतिथी म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते.

उद्घाटन समारंभास शिक्षा संस्कृती उत्थान न्यासचे राष्ट्रीय सचिव अतुल कोठारी, राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, आयआयएम नागपूरचे संचालक भीमराया मेत्री, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या कुलगुरु डॉ. मनाली क्षीरसागर, गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरू प्रशांत बोकारे, व्हीएनआयटीच्या संचालक मंडळाचे अध्यक्ष मदाभूशी मदन गोपाल, संचालक डॉ. प्रेमलाल पटेल, लघु उद्योग भारतीचे रवनीत खुराना या मान्यवरांची विशेष उपस्थिती होती.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, आज जग अत्यंत वेगाने पुढे जात आहे. पहिली औद्योगिक क्रांती १७६०मध्ये आली होती. त्यानंतरच्या आलेल्या तीन औद्योगिक क्रांतींचा काळ हा सुमारे अडीचशे वर्षांचा आहे, मात्र मागील पंधरा वर्षांतच तीन औद्योगिक क्रांतींचा अनुभव जगाने घेतला आहे. बदलांची गती लक्षात घेतली नाही, तर आम्ही मागे राहू शकतो. या क्रांतीला गती देणारे 'एआय'आणि 'डीप टेक्नॉलॉजी'च्या विकासात भारतीयांचे अत्यंत मोलाचे योगदान राहिले आहे. आम्हाला शैक्षणिक धोरणातून असे मानव संसाधन घडवायचे आहे, ज्यात व्यक्तीमध्ये सर्वंकष विकासासह नैतिक व व्यावसायिक गुणांचे रोपणही अपेक्षित आहे. भौतिक, नैतिक, शारीरिक क्षमतेसह व्यावसायिक म्हणून ती व्यक्ती देशाच्या अर्थव्यवस्थेत योगदान देणारीही ठरावी, अशी अपेक्षा आहे. जागतिक ज्ञान आणि भारतीय ज्ञान व्यवस्थेचा मेळ साधणारी आणि जागतिक आव्हानांचा सामना करणारी शिक्षण पद्धती आम्हाला विकसित करायची आहे, याकडे मुख्यमंत्री फडणवीस यांनी लक्ष वेधले.

### महाराष्ट्र ज्ञान सभा राष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन

विदेशी विद्यापीठांना आम्ही अनुकूल नव्हतो, असाही एक काळ होता, कारण त्यावेळी आम्ही त्यांच्याशी स्पर्धा करू शकत नव्हतो. आज ती परिस्थिती राहिलेली नाही. नवी मुंबईत आम्ही एज्युसिटी विकसित करत आहोत. त्यात अनेक विदेशी विद्यापीठाचे शिक्षण कमी खर्चात घेण्याची संधी आमच्या मुलांना उपलब्ध होणार आहे. आमच्या विद्यापीठांनीही या स्पर्धेत उतरून शिक्षणाचा तो स्तर गाठायला हवा, असे आवाहनही मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले.

यावेळी मुख्यमंत्री व मान्यवरांच्या हस्ते एका स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले. त्याचप्रमाणे 'बेस्ट प्रॅक्टीसेस ऑफ गोंडवाना युनिव्हर्सिटी' या पुस्तिकेचे प्रकाशनही पार पडले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या कुलगुरु डॉ. मनाली क्षीरसागर यांनी उपस्थितांचे आभार मानले.

दोन दिवस चालणाऱ्या या परिषदेत देशभरातील शिक्षण व उद्योग क्षेत्राशी निगडित तज्ज्ञ आणि प्रतिनिधी सहभागी झाले आहेत. नव्या शैक्षणिक धोरणाच्या संदर्भातून विकसित महाराष्ट्रासाठी शिक्षण या थीमवर आधारित महाराष्ट्र ज्ञान सभेचे हे आयोजन करण्यात आले आहे.

# नाशिकमध्ये कार विहिरीत कोसळून नऊ जणांचा मृत्यू



**दिंडोरी : प्रतिनिधी**

खासगी क्लासचे स्नेहसंमेलन आटोपून घरी निघालेल्या कुटुंबियांची कार विहिरीत कोसळल्याने नऊ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना शुक्रवारी रात्री दिंडोरी येथे घडली. मृतांमध्ये विद्यार्थी व पालकांचा समावेश आहे.

दिंडोरी येथील शिवाजीनगर भागात शुक्रवारी सायंकाळी खासगी क्लासतर्फे स्नेहसंमेलन व गुणगौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. स्नेहसंमेलन संपल्यानंतर रात्री १० वाजता इंदोरे येथील दरगोडे कुटुंबातील सदस्य एर्टिगा कारने घरी परतण्यासाठी निघाले. त्यावेळी परिसरातील एका विहिरीत त्यांची कार कोसळली.

या घटनेची माहिती समजल्यानंतर नगरपंचायतीचे अग्निशमन दल, आपत्ती व्यवस्थापन पथक व पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. विहीर पाण्याने भरलेली असल्याने बचावकार्यात अडथळे आले. अखेर क्रेनच्या साहाय्याने रात्री १२ वाजता ही कार विहिरीतून बाहेर काढण्यात आली.

या भीषण अपघातात सुनील दत्तात्रेय दरगोडे (३५), रेश्मा सुनील दरगोडे (३३), राखी सुनील दरगोडे, आशा अनिल दरगोडे, सृष्टी अनिल दरगोडे (१६), श्रेयस अनिल दरगोडे (११), माधुरी अनिल दरगोडे, श्रावणी अनिल दरगोडे, समृद्धी राजेश दरगोडे (७) यांचा मृत्यू झाला. त्यांच्या निधनामुळे परिसरात हळहळ व्यक्त होत

### मदत आणि सूचना

या भीषण अपघातानंतर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे. 'नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी येथील घटना अतिशय दुर्दैवी आणि मनाला वेदना देणारी ही घटना आहे. मृतांना भावपूर्ण श्रद्धांजली. त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत. मृतांच्या वारसांना पाच लाख रुपये आर्थिक मदत राज्य सरकारतर्फे देण्यात येईल. या घटनेची चौकशी करण्याचे आदेशसुद्धा जिल्हा प्रशासनाला देण्यात आले आहेत,' अशी पोस्ट मुख्यमंत्र्यांनी सोशल मीडियावर केली आहे. याशिवाय, रस्त्याच्या मध्ये असलेल्या अशा प्रकारच्या विहिरींचे तत्काळ ऑडिट करून त्यांची तिथे आवश्यकता आहे का तसेच तेथे काय उपायोजना करता येतील याबद्दलच्या सूचना देण्यात आल्याचे मुख्यमंत्र्यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितले.

## सोलापुरातही कार कालव्यात पडून तिघांचा मृत्यू

**सोलापूर :** माळशिरस (जि. सोलापूर) तालुक्यातील नातेपुते परिसरात पहाटे भीषण कार अपघातात तिघांचा मृत्यू झाला असून चालक थोडक्यात बचावला. मुंबईहून फोंडशिरसकडे जाणाऱ्या कारवरील चालकाचे नियंत्रण सुटल्याने कार थेट नीरा उजवा कालव्यात कोसळली. या अपघातात प्रीती टिळेकर (वय ३०), मंजुळा जठार (५०) आणि हनुमंत जठार (५५) यांचा मृत्यू झाला. मंजुळा आणि हनुमंत जठार हे मोगराळे (ता. माण) येथील रहिवासी असून ते सध्या मुंबई येथे वास्तव्यास होते. प्रीती टिळेकर (सध्या रा. खारघर, पनवेल) ही त्यांची मुलगी होती, तर सुनील टिळेकर गाडी चालवत होते. अपघातानंतर सुनील हे गंभीर जखमी अवस्थेत बाहेर आले. त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

## निवडक

### नांदेडमध्ये मध्यरात्री गँगवॉर; तिघांची हत्या; पाच जण जखमी

**नांदेड :** येथे शुक्रवारी मध्यरात्री गुन्हेगारी टोळ्यांमधील वर्चस्ववादातून गँगवॉरची घटना घडली. कॅनाल रोडवरील डी-मार्ट परिसरात झालेल्या या रक्तरंजित संघर्षात दोन्ही टोळ्यांचे मिळून तीन जण ठार झाले, तर पाच जण गंभीर जखमी झाले आहेत. पोलिसांनी या प्रकरणी तत्काळ कारवाई करत आतापर्यंत सात ते आठ जणांना ताब्यात घेतले असून धरपकड सुरू आहे. दरम्यान, अकोल्यात धुरंदर सिनेमा पाहून नशेखोरांनी केलेल्या हल्ल्यात दोघे जखमी झालेत.

### दिल्लीचा मुंबईवर विजय; समीर रिझवीची वादळी खेळी

**नवी दिल्ली :** समीर रिझवीच्या ५१ चेंडूत ९० धावांच्या वादळी खेळीच्या बळावर दिल्ली कॅपिटल्सने मुंबई इंडियन्सला शनिवारी (दि.४) आयपीएलमध्ये पराभवाचा धक्का दिला. मुंबईने प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत ६ बाद १६२ धावा केल्या होत्या. दिल्लीने १८.१ षटकांत सहा गडी राखून १६४ धावा करत सामना जिंकला. हार्दिक पांड्या आजारी असल्याने या सामन्यात मुंबईचे नेतृत्व सूर्यकुमार यादवने केले.

## पनवेल तालुक्यातील भाताणमध्ये विकासकामांचे भूमिपूजन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील भाताण ग्रामपंचायत क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी ग्रामपंचायत निधीतून मंजूर करण्यात आलेल्या विविध विकासकामांचा शुभारंभ शनिवारी (दि.४) मोठ्या उत्साहात पार पडला. या अंतर्गत गावात रस्ते काँक्रीटीकरण, समाजमंदिर आणि जलकुंभाची उभारणी अशा एकूण ६३ लाख रुपयांच्या कामांचे भूमिपूजन भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या हस्ते आणि रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर, पंचायत समितीच्या सभापती रंजना वास्कर आणि माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.

भाताण गावातील गणेश भोईर यांच्या घरापासून ते अशोक सम्राटनगरपर्यंतच्या रस्त्याचे १८ लाख रुपये खर्चून काँक्रीटीकरण करण्यात येणार आहे तसेच अशोक सम्राटनगरमध्ये १५ लाख रुपये खर्चाचे समाजमंदिर आणि संपूर्ण गावाची पाण्याची गरज भागवण्यासाठी ३० लाख रुपये खर्चून एक लाख लिटर क्षमतेचा भव्य जलकुंभ उभारला जाणार आहे.

या कार्यक्रमाला पंचायत समितीचे उपसभापती भूपेंद्र पाटील, सदस्य अस्मिता पाटील, महापालिकेच्या स्थायी समितीचे सभापती बबन मुकादम, जिल्हा परिषद सदस्य अनन्या गाताडे, विभागीय अध्यक्ष अविनाश गाताडे, पोयंजे पंचायत समिती विभागीय अध्यक्ष मंगेश लबडे, सरपंच तानाजी पाटील, तानाजी खंडागळे, प्रवीण खंडागळे, महेंद्र गोजे, राम गोजे, महादेव पाटील, प्रवीण ठाकूर यांच्यासह भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या विकासकामांच्या माध्यमातून भाताण गावातील पायाभूत सुविधांचा प्रश्न सुटणार असून ग्रामस्थांनी याबद्दल समाधान व्यक्त केले आहे.

## म्हसळ्यात शाळकरी मुलीची आत्महत्या



**म्हसळा : प्रतिनिधी**

म्हसळा तालुक्यात एका अत्यंत दुःखद आणि मन हेलावून टाकणारी घटना घडली आहे. वरवटणे येथील एका १४ वर्षीय मुलीने शुक्रवारी (दि.३) सायंकाळी आत्महत्या केली. त्यामुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार संबंधित विद्यार्थिनी जिजामाता शिक्षण संस्था अंतर्गत वरवटणे येथील शाळेत इयत्ता नववीत शिकत होती. ती रात्री उशिरापर्यंत मोबाईलवर बोलत असल्यामुळे आई-वडिलांनी नाराजी व्यक्त केली. घरचे आपल्याला ओरडतील किंवा मारतील याची भीती मनात ठेवून तिने शुक्रवारी सायंकाळी घरातील लाकडी वस्तूला साडी बांधली आणि गळफास लावून आपले आयुष्य संपवले.

या मुलीला तातडीने म्हसळा येथील ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आले, मात्र डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. या घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलीस अधिकारी सहाय्यक निरीक्षक रवींद्र पारखे यांनी घटनास्थळी दाखल होत पंचनामा केला. या प्रकरणी अधिक तपास सुरू आहे.

दरम्यान, मयत विद्यार्थिनी अभ्यासात अत्यंत हुशार होती तसेच शिष्यवृत्ती व मेरिटमध्ये सातत्याने स्थान मिळवत असे. याशिवाय खेळ आणि सांस्कृतिक कार्यक्रमांमध्येही ती आघाडीवर होती. तिच्या अकाली निधनामुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

## अभिनेता जॅकी श्रॉफची माथेरान सफर

### स्थानिकांशी गप्पा मारत जुन्या आठवणींना दिला उजाळा





**नेरळ : प्रतिनिधी**

हिंदी चित्रपटसृष्टीतील दिग्गज अभिनेते जॅकी श्रॉफ यांनी आपल्या लाडक्या माथेरान शहराशी असलेले जिव्हाळ्याचे नाते अधोरेखित केले आहे. व्यस्त वेळापत्रकातून वेळ काढत त्यांनी माथेरानला भेट दिली आणि ग्रामदैवत श्री पिसारनाथ महाराज मंदिरात जाऊन मनोभावे दर्शन घेत अभिषेक केला.

जॅकी श्रॉफ यांचे माथेरानशी असलेले नाते केवळ पर्यटनापुरते मर्यादित नाही, तर ते गेल्या सुमारे ३५ वर्षांपासून श्रद्धेच्या आणि आठवणींच्या धाग्याने विणलेले आहे. त्यांचा कोणताही नवीन चित्रपट प्रदर्शित होण्यापूर्वी पिसारनाथ महाराजांचे आशीर्वाद घेण्याची त्यांची जुनी परंपरा आहे. श्रावण महिन्यातही ते आवर्जून येथे उपस्थित राहण्याचा प्रयत्न करतात.

दर्शनानंतर जॅकीदादांनी आपल्या साध्या व मनमोकळ्या स्वभावाचे दर्शन घडवले. त्यांनी शार्लेट लेक परिसरात फेरफटका मारला आणि आपल्या जुन्या मित्रमंडळींशी संवाद साधला. यावेळी त्यांनी प्रसिद्ध कदम टी स्टॉल येथे थांबून चहा आणि बटाटावड्याचा आस्वाद घेतला. एका सुपरस्टारला आपल्यामध्ये इतक्या साधेपणाने वावरताना पाहून स्थानिक नागरिकांसह पर्यटक सुखावले.

माथेरानच्या निसर्गरम्य वातावरणात स्थानिकांशी गप्पा मारताना जॅकी श्रॉफ यांची मातीशी असलेली नाळ आजही तितकीच घट्ट असल्याचे दिसून आले. माथेरान मला नेहमीच शांतता आणि ऊर्जा देते, अशा भावना यावेळी त्यांच्या भेटीतून व्यक्त झाल्या.

निसर्गरम्य माथेरानमध्ये सेलिब्रिटींची ये-जा सुरू असते. येथे येऊन ते रिफ्रेश होत असतात. जॅकीही त्यापैकीच एक आहेत.

## बारामतीची पोटनिवडणूक बिनविरोध व्हावी -मुख्यमंत्री

**मुंबई : प्रतिनिधी**



दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पश्चात राजकीय मतभेद बाजूला ठेवून बारामती विधानसभा मतदारसंघाची पोटनिवडणूक बिनविरोध व्हावी, अशी भूमिका राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी (दि. ४) मांडली. सुनेत्राताईंना सर्वच पक्षांनी पाठिंबा देऊन महाराष्ट्राची राजकीय संस्कृती जपण्याचे आवाहनही त्यांनी केले.

पोटनिवडणुकीच्या संदर्भात प्रसारमाध्यमांशी बोलताना मुख्यमंत्री फडणवीस बोलताना म्हणाले की, बारामती पोटनिवडणुकीत सर्वच पक्षांनी सुनेत्राताईंना पाठिंबा द्यावा, अशी माझी विनंती आहे. ही निवडणूक बिनविरोध होणे महाराष्ट्राच्या परंपरेला साजेसे ठरेल. यापूर्वीही आपण अशा निवडणुका बिनविरोध केल्या आहेत. माजी गृहमंत्री आर.आर. आबांच्या निधनानंतर झालेली पोटनिवडणूक भाजपने न लढण्याचा निर्णय घेतला होता. तोच मोठेपणा आताही सर्व पक्षांनी दाखवावा.

## अशोक खरातला मदत करणाऱ्या अधिकाऱ्यांना थेट बडतर्फ करणार

**नाशिक : प्रतिनिधी**

राज्यात सध्या नाशिकमधील भोंदूबाबा अशोक खरात प्रकरण केंद्रस्थानी असून त्याचे एकापेक्षा एक कारनामेही समोर येत आहेत. त्यातच खरातच्या मोबाईल कॉलिंगच्या सीडीआरमध्ये काही नेते आणि अधिकाऱ्यांचीही नावे असल्याची माहिती आहे. त्याच पार्श्वभूमीवर आता महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना इशाराच दिला आहे.

अशोक खरात प्रकरण हे महाराष्ट्राच्या संस्कृतीला काळिमा फासणारे घटना आहे. त्यामुळेच या प्रकरणी एसआयटी योग्य पद्धतीने कारवाई करत आहे. ज्यांच्याकडे पुरावे असतील त्यांनी एसआयटीला पुरावे द्यावेत. संबंधित लोकांवर कडक कारवाई केली जाईल. आमच्या अधिकाऱ्यांनी जर मदत केली असेल, तर त्यांच्यावरदेखील कारवाई होईल. एसआयटी टीमकडून आमच्याकडे नाव आल्यावर त्यांना नोकरीवर ठेवणार नाही, असे मंत्री बावनकुळे यांनी स्पष्ट केले.

### महसूलमंत्र्यांचा इशारा



ते पुढे म्हणाले की, खरात प्रकरणात कोणीही सुटणार नाही. यात ज्या ज्या अधिकाऱ्यांची नावे समोर येतील त्यांना कामावरून काढून टाकणार. खरातच्या भागातील सीसीटीव्ही तपासणार आहोत, त्यात जे दिसून येतील त्यांच्यावर कारवाई केली जाईल. खरातला जमिनी मालमत्ता जमा करण्यासाठी मदत करणाऱ्यांवरही कारवाई करणार आहे. केवळ बदली नाही, तर अशा अधिकाऱ्यांना बडतर्फ करणार, मग ते कोणत्याही खात्यातील असो!

# नाशिकमध्ये खरात पार्ट २

## तब्बल १२१ महिलांचे अश्लील व्हिडीओ

**नाशिक : प्रतिनिधी**

नाशिकमधील भोंदू अशोक खरातचे प्रकरण संपूर्ण देशभर चर्चेत आहे. एसआयटीकडून या प्रकरणाचा तपास सुरू असतानाच नाशिकमध्ये अशाच प्रकारे महिलांच्या लैंगिक शोषणासंबंधी आणखी एक धक्कादायक घटना समोर आली आहे. खरात पार्ट २ अशी चर्चा नाशिकमध्ये या प्रकरणाविषयी सुरू आहे.

शहराच्या सातपूर परिसरात घडलेल्या या प्रकरणाने नाशिक शहर पुन्हा एकदा हादरले आहे. स्वतःला पत्रकार व लघुउद्योजक कन्सल्टंट म्हणवणाऱ्या ६३ वर्षीय व्यक्तीने आपल्याकडे १२ लाखांची खंडणी मागितली जात असल्याची तक्रार पोलिसांकडे केली होती. त्यानुसार त्याला ब्लॅकमेल करणाऱ्या चौघांना पोलिसांनी बेड्या ठोकल्या, पण त्यातून तक्रारदाराचेच महिलांच्या अत्याचाराचे शेकडो व्हिडीओ पोलिसांच्या हाती लागले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार या प्रकरणात तक्रारदाराच्या कार्यालयातून



चोरून नेलेल्या टॅबमधील अश्लील व्हिडिओ आणि फोटो सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी देत तब्बल १२ लाख रुपयांची खंडणी मागणी चौघांनी केली होती. अटक केलेल्या चौघांच्या टोळीमधील एक संशयित हा तक्रारदाराकडे 'ऑफिसबॉय' होता. त्याच्या चौकशीतून धक्कादायक खुलासा झाला असून या प्रकरणाला नवे वळण मिळाले आहे.

या प्रकरणात पोलीस तपासातून समोर आलेल्या माहितीनुसार स्वयंघोषित पत्रकार असलेला तक्रारदार रवींद्र गणपत एरंडे हा २००३पासून अनेक महिलांना उद्योग उभारणीचे आमिष दाखवून त्याने आपल्या केबिनमध्ये बोलावले. त्यांच्या

### पीडितांना पोलिसांचे आवाहन

*ज्या व्हिडीओवरून ऑफिसबॉयसह चौघे संशयित हे फिर्यादी एरंडे याला ब्लॅकमेल करीत होते, ती हार्डडिस्क, दोन पेनड्राइव्ह व मोबाईल संशयितांकडून पोलिसांनी जप्त केले आहेत. त्याची तपासणी करताना पोलिसही चक्रावले, कारण त्यात २००३ ते २०२४दरम्यान १२१हून अधिक महिलांचे अश्लील व्हिडीओ आढळून आले. ऑफिसमध्ये लावलेल्या कॅमेऱ्याद्वारे हे रेकॉर्डिंग केल्याचे दिसून येत आहे. ज्या महिला शोषणाला बळी पडल्या आहेत, त्यांनी न घाबरता पुढे यावे. पीडितांची ओळख पूर्णपणे गोपनीय ठेवली जाईल, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.*

अडचणींचा फायदा घेत अत्याचार केले. या अत्याचाराचे त्याने छुप्या रीतीने रेकॉर्डिंग केले. हे सर्व व्हिडीओ त्याने टॅब आणि हार्डडिस्कमध्ये साठवून ठेवले होते

दरम्यान, त्याच्याकडे ऑफिसबॉय म्हणून काय करणाऱ्या आकाश बकरे याने टॅब व हार्डडिस्क चोरली. त्यात १००हून अधिक अश्लील व्हिडिओ पाहून त्याने आपल्या तीन मित्रांच्या मदतीने तक्रारदार रवींद्र गणपत एरंडे याला ब्लॅकमेल करण्यास सुरुवात केली. व्हिडीओ व्हायरल न करण्यासाठी १२ लाख रुपयांची मागणी केली. सुरुवातीला एरंडे यांनी त्यांना १० हजार रुपये दिले, परंतु ब्लॅकमेल करणाऱ्या चौघांची मागणी वाढत गेल्याने त्याने सातपूर पोलिस ठाण्यात धाव घेत चोरी व खंडणीची तक्रार दाखल केली.

तपासात पोलिसांच्या हाती व्हिडीओ लागताच त्यांनाही धक्का बसला, कारण आपल्याकडून १२ लाखांची खंडणी मागितल्याची फिर्याद एरंडेनेच दिली होती, मात्र तोच आरोपीच्या पिंजऱ्यात गेला आहे. पोलिसांनी संशयित एरंडे यालाही अटक केली आहे. त्याच्याविरोधातच अत्याचारासह गंभीर गुन्हे दाखल होण्याची शक्यता व्यक्त केली जात असून अधिक तपास सुरू आहे.

## वेताळदेव मूर्ती विटंबना प्रकरण

# लव्हेज ग्रामस्थ उपोषणाच्या पवित्र्यात

**खोपोली : प्रतिनिधी**

नगरपालिका हद्दीतील लव्हेज गावाच्या हद्दीतील स्टील कारखान्याच्या आवारात असलेली वेताळ देवाची मूर्ती हटवल्याप्रकरणी ग्रामस्थ आक्रमक झाले असून, सातत्याने नगरपालिका प्रशासन व पोलीस प्रशासन यांना निवेदन देऊन विनंती करून ही संबंधित ठेकेदारावर कारवाई न करण्याच्या भूमिकेवर ग्रामस्थ आता आक्रमक झाले असून याबाबत सोमवारपासून नगर परिषद कार्यालयावर भव्य मोर्चा काढण्यात येणार असल्याचे ग्रामस्थांतर्फे समीर शिंदे व किशोर पाटील यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.

लव्हेज गावाच्या हद्दीतील स्टील कारखान्यात ग्रामस्थांच्या कवडीमोल भावाने जमिनी घेण्यात आल्या त्यावेळेस ग्रामस्थांना रोजगाराची संधी मिळेल या भावनेतून ग्रामस्थांनी जमिनी दिल्या दरम्यान, या कंपनीच्या आवारात असलेल्या मोकळ्या जागेत वेताळ देवस्थान असून या देवस्थानाची ग्रामस्थ पन्नास वर्षापासून पूजाअर्चा नेहमी करीत असतात त्याबाबत मानपाणही देत असतात, सदरचे मूर्ती हलवण्यापूर्वी ग्रामस्थांना विश्वासात घ्यावे अशी विनंती ग्रामस्थांतर्फे कंपनी व्यवस्थापनला केली होती. दरम्यान, मागील आठवड्यात



सदर जमिनीचे सपाटीकरण करणाऱ्या ठेकेदाराने सदरची मूर्ती जेसीबी यंत्राने हालवून दूरवर नेऊन ठेवली आहे, यामुळे आमच्या भावना दुखावल्या असून मूर्तीची पूर्णपणे विटंबना झाली असून संबंधित ठेकेदारावर नियमाप्रमाणे कारवाई करण्यात यावी अशी मागणी ग्रामस्थांतर्फे पोलीस प्रशासनाला करण्यात आली होती.

दरम्यान, या प्रकरणात पूर्णपणे व्यवस्थापनाने हात वर केले असून, अधिकारी वर्ग त्याची जबाबदारी घ्यायला तयार नाही, मात्र ग्रामस्थांनी मात्र या झालेल्या मूर्ती विटंबना झाल्याच्या पार्श्वभूमीवर सोमवारपासून तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आल्याची माहिती ग्रामस्थान तर्फे समीर शिंदे व किशोर पाटील यांनी दिली, याबाबतचे निवेदन लवकरच नगरपालिका प्रशासन व पोलीस प्रशासनाला देणार असल्याचे पण त्यांनी सांगितले.

दरम्यान, आज सकाळी सर्व ग्रामस्थांनी पोलीस निरीक्षक सचिन हिरे यांची भेट घेऊन संबंधित ठेकेदारावर मूर्ती विटंबना केल्याच्या पार्श्वभूमीवर गुन्हा दाखल करावा, अशी जोरदार मागणी केली. पण पोलीस निरीक्षक हिरे यांनी याबाबतचा आपला तपास सुरू असून तपास पूर्ण झाल्यानंतर पोलीस प्रशासनाची भूमिका स्पष्ट करू असे सांगितले, पण ग्रामस्थांचे समाधान झाले नाही व त्यांनी पोलीस ठाण्याबाहेर येऊन एकत्रितपणे मूर्ती विटंबना प्रकरणी तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्याचा निर्धार व्यक्त केला आणि सोमवारी त्याबाबत ग्रामस्थ आंदोलन करणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

# कलिंगडला दर मिळत नसल्याने शेतकरी हवालदिल



**मुरूड : प्रतिनिधी**

जिल्ह्यात यंदा चांगली थंडी होती त्याचा फायदा कलिंगड पिकाला झाला आहे. त्यामुळे गेल्या वर्षापेक्षा अधिक प्रमाणात कलिंगडची आवक झाली असली तरीही शेतकऱ्यांना मालाला दर मिळत नसल्याने शेतकरी हवालदील झाला आहे.

दोन पैसे सुटावे त्याकरिता दुसऱ्या तालुक्यात जाऊन चांगला दर मिळतयं का त्या करिता रोहा तालुक्यातील काढणे खूर्द या गावातील शेतकरी संतोष नाकटी व हर्षद बैकर हे भांड्यानी टेम्पोत हिरवा रंग असणारी गोल आकाराची गावठी कलिंगड मुरूड या बाजारात विक्रीसाठी घेऊन आले, परंतु याठिकाणी चांगला दर मिळत नसल्याने शेवटी हताश होऊन गोड असणारी मोठी कलिंगड तीन नग १०० रुपयांच्या दराने विक्री करण्यात आली. दर कमी असल्याने ग्राहकांने यांचा फायदा घेत कलिंगड घेण्यासाठी झुंबड उडाली. शेतकरी मात्र कमी भाव मिळत असल्याने नाराज आहेत. तर ग्राहक खुश आहे.

मुरूड तालुक्यातील शिघ्रे, आंबोली, तेलवडे आदी भागात कलिंगडचे मोठे उत्पादन झाले, परंतु बाजारात भाव मिळत नसल्याने कलिंगड मोठ्या प्रमाणात विक्री होताना दिसत नाही. कलिंगड विक्री होत नसल्याने शेतकरी नाराजी व्यक्त करीत आहे.

# मटका जुगार अड्ड्यावर धाड; एक जण ताब्यात

**खालापूर : प्रतिनिधी**

खोपोली बाजारपेठ परिसरात सुरू असलेल्या मटका जुगारावर स्थानिक गुन्हा अन्वेषण विभाग (LCB) रायगड यांनी कारवाई करत एका आरोपीस रंगेहात पकडले आहे. खोपोली पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

खोपोली बाजारपेठ येथे आरोपी स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी नागरिकांकडून पैसे घेऊन 'कल्याण' नावाचा मटका जुगार चालवत असल्याची



गोपनीय माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी सापळा रचून आरोपीस ताब्यात घेतले. या कारवाईदरम्यान पोलिसांनी एकूण तीन हजार ४५ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून, त्यामध्ये विविध दरांच्या भारतीय चलनी नोटांसह मटका जुगार खेळण्यासाठी लागणारे साहित्य जप्त केले.

ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक आंचल दलाल, अप्पर पोलीस अधीक्षक अभिजीत शिवथरे तसेच स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मिलिंद खोपडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईत सपोनि मानसिंग पाटील, सहायक फौजदार संदीप पाटील, हवालदार प्रतीक सावंत, रवी मुंडे, रणजित खराडे, पोलीस कॉन्स्टेबल प्रदीप खरात यांचा सहभाग होता. पेट्रोलिंगदरम्यान रणजित खराडे यांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार कारवाई करण्यात आली.

# रायगड जि.प.च्या बिरवाडी प्राथमिक शाळेत 'गो अनेमिया गो'

**पोलादपूर : प्रतिनिधी**

राष्ट्रीय बालरोग संघटना महाराष्ट्र राज्य शाखा यांच्या 'गो अनेमिया गो' या प्रकल्पांतर्गत रायगड जिल्हा बालरोगतज्ञ संघटनेच्या शाखेने रायगड जिल्हा परिषदेच्या बिरवाडीतील प्राथमिक शाळेत 'शालेय विद्यार्थ्यांची रक्तक्षय तपासणी व उपचार शिबिर' हा उपक्रम राबविला. या शिबिरात डॉ. चंद्रशेखर दाभाडकर, डॉ. सुनील शेठ, डॉ.अजित पुल्ले व डॉ. आनंद जोगदंड यांनी ११५ विद्यार्थ्यांची तपासणी केली. त्यातील ७६ मुला मुलींची रक्त तपासणी करण्यात आली आणि गरजू विद्यार्थ्यांना जंताच्या गोळया, रक्त वाढण्याच्या गोळया व खाऊचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमास डॉक्टर्स असोसिएशन महाडचे अध्यक्ष डॉ.नितीन देशमुख, वैद्यकीय अधिकारी डॉ.अनिल काकड, सरपंच श्री. बागडे उपस्थित होते. या दरम्यान घेण्यात आलेल्या मार्गदर्शन शिबिरात डॉ. शेखर दाभाडकर यांनी 'मुलांमधील सकस आहाराचे महत्व' या विषयावर तर डॉ.सुनील शेठ यांनी रक्तक्षयाबद्दल मार्गदर्शन केले.



# पोलीस उपनिरीक्षक शिवाजी जुंदरे यांना पुरस्कार



**चौक : प्रतिनिधी**

खालापूर तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस उप निरीक्षक शिवाजी जुंदरे यांना महाड येथे स्वराज्य भूमी गौरव संमेलनात आदर्श पोलीस सेवा रत्न पुरस्कार देऊन सन्माननीत करण्यात आल्याने त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

आई फाऊंडेशन भारत, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ व स्वराज्य भूमी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या स्वराज्य भूमी गौरव संमेलनात सुप्रसिद्ध अभिनेता संतोष पाटील, पत्रकार संघाचे राज्य चिटणीस विश्वास आरोटे, उदय भाऊसाहेब वाघेरे, संचालक, ग्रुप ऑफ कंपनी- पिंपरी पुणे, प्रा. डॉ. बी. एन. खरात संचालक समृद्धी पब्लिकेशन युवा पुरस्कार विजेते, महाराष्ट्र शासन, डॉ. विनोदराव मोरे संस्थापक अध्यक्ष आई फाउंडेशन, रायगड (भारत) यांच्या हस्ते करण्यात आला.

पोलीस उप निरीक्षक शिवाजी जुंदरे यांनी खून दरोडे यांचे तपास करून आरोपी यांना जेरबंद केले आहे. बाल विवाह रोखणे, दारू बंदी, व्यसन मुक्ती साठी कार्यरत, अपघातग्रस्त यांना मदत करणे, आदिवासी विकास साठी प्रयत्न आणि गरजू विद्यार्थी यांना शैक्षणिक मदत करीत असतात.

# सीकेटी महाविद्यालयात 'एसपीएसएस'वर कार्यशाळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

खांदा कॉलनीमधील चांगु काना ठाकूर (सीकेटी) कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या संशोधन कौशल्यवृद्धीसाठी आयोजित करण्यात आलेली "SPSSवर आधारित प्रत्यक्ष प्रशिक्षण" ही एकदिवसीय कार्यशाळा शनिवारी (दि.४) यशस्वीरीत्या झाली.

वाणिज्य व लेखाशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित या उपक्रमाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना डेटा विश्लेषणाच्या आधुनिक पद्धतींचे ज्ञान देणे हा होता. कार्यशाळेत विद्यार्थ्यांना SPSS सॉफ्टवेअरची मूलभूत माहिती देण्याबरोबरच त्याचा प्रत्यक्ष वापर कसा करावा याचे मार्गदर्शन करण्यात आले. डेटा संकलन, वर्गीकरण,



विश्लेषण आणि निष्कर्ष मांडणी या प्रक्रियेचे सविस्तर प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांसमोर सादर करण्यात आले.

या कार्यशाळेत तज्ज्ञ प्राध्यापक डॉक्टर. सोहिल पिराणी यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी संशोधन प्रक्रियेत SPSS चे महत्त्व अधोरेखित करताना, विद्यार्थ्यांना प्रोजेक्ट व रिसर्च पेपर तयार करताना येणाऱ्या अडचणी कशा सोडवाव्यात याबाबत उपयुक्त सूचना दिल्या.

कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी विविध शंका विचारून सक्रिय सहभाग नोंदवला. तसेच, या कार्यशाळेमुळे त्यांच्या संशोधनाविषयीची समज अधिक दृढ झाल्याचे त्यांनी व्यक्त केले. प्राचार्य डॉ.एस. के. पाटील व विभागप्रमुख प्राध्यापक डॉक्टर एस.बी. यादव व डॉक्टर एन. ई. कोळी यांनी या उपक्रमाचे कौतुक करत, भविष्यातही अशा कार्यशाळांचे आयोजन करण्यात येईल असे सांगितले.

# तलावातील पाण्यावर फुलवली फळा-फुलांची शेती

**पेण : रामप्रहर वृत्त**

पेण तालुक्यातील खारेपाट विभागातील ठाकूरबेडी येथील प्रगतशील, कष्टाळू शेतकरी गंगाधर ठाकूर व नागेश ठाकूर यांनी तलावातील पाण्यावर फूलशेती व फळशेती तयार केली असून ती चांगलीच बहरली आहे. त्यांचा आदर्श इतर शेतकऱ्यांनी घ्यावा. अशी फळबाग व फुलबाग त्यांनी फुलविली आहे. विशेषतः खारेपाट विभागातील पाण्याच्या टंचाईच्या पार्श्वभूमीवर एक आशेचा किरण ठरलेली प्रेरणादायी कहाणी समोर आली आहे. प्रतिकूल परिस्थितीवर मात करीत येथील जिद्दी शेतकरी, नागेश ठाकूर, व गंगाधर ठाकूर या ठाकूर बंधूंनी आपल्या कष्टाच्या बळावर फळशेती, फुलशेती, हळद, याचा यशस्वी प्रयोग उभा केला आहे.

तलावातील मर्यादित पाण्याचा योग्य आणि शाश्वत वापर करत त्यांनी शेतीत विविध फुलांची, विविध फळांची, लागवड केली आहे. जिथे अनेक शेतकरी पाण्याअभावी हतबल झाले आहेत, तिथे या ठाकूर बंधूंनी योग्य नियोजन, मेहनत आणि नव कल्पना याच्या जोरावर नवसंजीवनी दिली आहे. त्यांच्या शेतात फुललेली रंगीबेरंगी फुले, बहरलेली फळझाडे ही केवळ त्यांच्याच नव्हे तर खारेपाट विभागातील प्रेरणेचे जिवंत उदाहरण आहे. स्थानिक स्तरावर त्यांच्या या प्रयोगाची मोठी चर्चा सुरू असून, याचा इतर शेतकरी याच पद्धतीचे अनुकरण करून प्रयोग करतील अशी आशा वाटते. गतवर्षी सुद्धा नागेश ठाकूर यांनी मोठ्या प्रमाणावर अशीच शेती केली होती.

विशेष म्हणजे अत्यल्प साधन सामुग्री, कमी पाणी, पाण्याचे व्यवस्थापन व योग्य नियोजन या महत्त्वाच्या गोष्टींचा वापर करून त्यांनी ही फळाफुलांची शेती फुलविली आहे. या प्रात्यक्षिकाच्या कृतीतून ठाकूर बंधूंनी हे दाखवून दिले आहे. आज या शेतीमुळे आर्थिक स्थैर्य तर मिळेलच, परंतु शेतकऱ्यांना नवी दिशा मिळेल.

खारेपाटच्या कोरड्या जमिनीत आशेची फुले फुलविण्याचा नागेश ठाकूर आणि गंगाधर ठाकूर यांचे काम कौतुकास्पद आहे. प्रशासनाने या प्रयोगशील शेतकऱ्यांचा खरोखर सन्मान केला पाहिजे, असे मत येथील सामाजिक कार्यकर्ते सी.आर. म्हात्रे यांनी व्यक्त केले.



# पोलीस उपनिरीक्षक शारीरिक चाचणीचा सुधारित कार्यक्रम जाहीर

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या पोलीस उपनिरीक्षक मर्यादित विभागीय स्पर्धा मुख्य परीक्षा-२०२३ या परीक्षेत शारीरिक चाचणीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची चाचणी पूर्वी प्रशासकीय कारणास्तव पुढे ढकलण्यात आली होती. आता सुधारित कार्यक्रमानुसार ही शारीरिक चाचणी १५ ते ३० एप्रिल २०२६ या कालावधीत घेण्यात येणार आहे.

पोलीस उपनिरीक्षक मर्यादित विभागीय स्पर्धा मुख्य परीक्षा-२०२३ या परीक्षेचा निकाल ९ मे २०२५ रोजी जाहीर करण्यात आला होता. परीक्षेत शारीरिक चाचणीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची चाचणी पूर्वी प्रशासकीय कारणास्तव पुढे ढकलण्यात आली होती.

आता सुधारित कार्यक्रमानुसार ही शारीरिक चाचणी १५ ते ३० एप्रिल २०२६ या कालावधीत घेण्यात येणार आहे. चाचणी नवी मुंबई येथील पोलीस मुख्यालय, रोडपाली, सेक्टर १७, कळंबोली येथे पार पडणार असून ती डिजिटल तंत्रज्ञानावर आधारित प्रणालीद्वारे घेतली जाणार आहे.

उमेदवारांनी शारीरिक चाचणीच्या तयारीच्या दृष्टीने याची नोंद घ्यावी, असे आवाहन महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या वतीने करण्यात आले आहे. चाचणीचा सविस्तर कार्यक्रम महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावर स्वतंत्रपणे प्रसिद्ध करण्यात आला असल्याचे आयोगाने कळविले आहे.

## दुखवटा

### बाळकृष्ण देशमुख

**मोहोपाडा :** देवळोली गावचे बाळकृष्ण परशुराम देशमुख (वय ९०) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुले,



दोन विवाहित मुली, जावई, बहिणी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. कै. बाळकृष्ण देशमुख यांचा दशक्रिया विधी गुरुवारी (दि.९) धार्मिक रितीरिवाजानुसार श्री क्षेत्र धाकटी पंढरी साजगाव येथील पाताळगंगा नदीच्या संगमावर होणार आहे. तर उत्तर कार्य विधी (तेरावे) रविवारी (दि.१२) सकाळी ११.३० वाजता देवळोली गावी होणार आहेत.

## निवडक

### पाले बुद्रुक येथून मायलेक बेपत्ता

**पनवेल :** तालुक्यातील पाले बुद्रुक येथील राहत्या घरातून एक विवाहित महिला आपल्या तीन वर्षीय मुलासह



बेपत्ता झाल्याने ते दोघे हरवल्याची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. रितीका अजय गायकर, (वय २७ वर्षे) अंगाने सडपातळ, रंग गोरा, डोळे काळे, उंची चार फुट तीन इंच, नाक बसके, उजव्या गालावर काळी मोठी जन्मखुण, अंगात नेसुन काळा पंजाबी ड्रेस, भाषा मराठी–इंग्रजी–हिंदी बोलते. सोबत मुलगा रूषभ (वय तीन) यास घेवुन गेली आहे. या दोघांबद्दल कोणाला अधिक माहिती असल्यास त्यानी पनवेल तालुका पोलीस ठाणे किंवा पोलीस नाईक प्रदीप पोपेटे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### ट्रेनमधून उतरताना प्रवासी जखमी

**पनवेल :** हार्बर रेल्वे मार्गावरील मानसरोवर रेल्वे



स्थानकात शनिवारी एक अपघात घडला असून, चालत्या लोकल ट्रेनमधून उतरण्याच्या प्रयत्नात एका प्रवाशाचा तोल गेल्याने तो प्लॅटफॉर्मवर कोसळला. या अपघातात प्रवाशाच्या डोक्याला दुखापत झाली आहे. यावेळी कर्तव्यावर असलेल्या रेल्वे पोलिसांनी जखमी प्रवाशाला तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखल केले आहे. दरम्यान, धावत्या गाडीतून प्रवाश्यांनी उतरू नये, असे आवाहन रेल्वे प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

### चाकूचा धाक दाखवून महिलेची लूट

**पनवेल :** नवीन पनवेल परिसरात ज्येष्ठ महिलेला चाकूचा धाक दाखवून सोनसाखळी लुटल्याची घटना घडली. दरम्यान या परिसरातील अशा घटनांमुळे महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा चर्चेत आला आहे. नवीन पनवेलमधील सेक्टर ११ येथील एका सोसायटीत राहणाऱ्या ८० वर्षीय ज्येष्ठ महिला घरी परतत असताना सोसायटीच्या आवारातच दोन अनोळखी तरुणांनी त्यांना अडवले. या दोन्ही चोरांनी चाकूचा धाक दाखवत त्यांच्या गळ्यातील सोन्याची माळ हिसकावून घेतली आणि तात्काळ तेथून पसार झाले. या प्रकरणी तक्रार दाखल करण्यात आली असून पोलीस आरोपींचा शोध घेत आहेत.

### पार्किंगजवळ आढळला मृतदेह

**पनवेल :** मानसरोवर रेल्वे स्टेशनच्या बाहेर पार्किंगच्या बाजुला एका अनोळखी बेवारस इसमाचा मृतदेह आढळून आला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध कामोठे पोलीस करीत आहेत. अनोळखी बेवारस इसम वय ५० वर्षे, उंची ५ फुट ७ इंच, रंग सावळा, दोन्ही डोळे मिटलेले व तोंड बंद दिसत आहे. डोक्यास काळे–पांढरे वाढलेले केस तसेच दाढी व मिशी वाढलेली काळी पांढरी, उजवे हाताचे मनगटाचे खाली त्रिशुल व ओमचे चिन्हा तसेच असे गोंदविलेले, अंगात काळ्या रंगाचे जॅरकिंग चैन असलेले व राखाडी रंगाची पॅन्ट परिधान केलेले आहे. या इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी कामोठे पोलीस ठाणे किंवा पोलीस उपनिरीक्षक महेंद्र डोके यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# सीकेटी महाविद्यालयात रोजगार मेळावा

## टाटा, व्हीनस सेफ्टी अँड हेल्थ, एचडीएफसी इत्यादी दिग्गज कंपन्यांचा सहभाग

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) कला, वाणिज्य आणि विज्ञान (अधिकारप्रदत्त स्वायत्त) महाविद्यालयाच्या प्लेसमेंट सेलतर्फे गुरुवारी (दि.२ आयोजित करण्यात आलेला भव्य 'रोजगार मेळावा' उत्साहात झाला.





या मेळाव्यात शैक्षणिक वर्ष २०२५–२६ मधील पदवी व पदव्युत्तर विद्यार्थ्यांसह महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांनीही उत्स्फूर्त सहभाग नोंदवला असून, एकूण २४८ विद्यार्थ्यांनी या मेळाव्यासाठी आपली नावनोंदणी केली होती.

या वर्षीच्या रोजगार मेळाव्याचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे बँकिंग, आयटी, फार्मा, मॅन्युफॅक्चरिंग, रिटेल आणि एज्युकेशन अशा विविध क्षेत्रांतील नामांकित एकूण ३४ कंपन्या सहभागी झाल्या होत्या.

यामध्ये नोमुरा (Nomura), टाटा आयआयएस (Tata IIS), एचडीएफसी बँक (HDFC Bank), कोटक बँक – मणीपाल (Kotak Bank), आरपीजी लाईफ सायन्सेस लिमिटेड (RPG Life Sciences Ltd), एचडीबी फायनान्शियल सर्व्हिसेस (HDB Financial Services), व्हीनस सेफ्टी अँड हेल्थ (Venus Safety & Health), आणि महिंद्रा इंटिग्रेटेड बिझनेस सोल्यूशन्स (Mahindra Integrated Business Solutions) यांसारख्या जागतिक स्तरावरील नामांकित कंपन्यांनी विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेतल्या.

सीकेटी महाविद्यालयाच्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये केवळ आत्मविश्वासाचे वातावरण निर्माण झाले नाही, तर त्यांच्या व्यावसायिक स्वप्नांना एक नवी दिशा मिळाली आहे. पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण पूर्ण करत असतानाच अशा जागतिक स्तरावरील संधी उपलब्ध झाल्यामुळे विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्याची खऱ्या अर्थाने मुहूर्तमेढ रोवली गेली आहे.

हा मेळावा यशस्वी करण्यासाठी प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील आणि आय.क्यू.ए.सी. (IQAC) समन्वयक प्रो. डॉ. बी. डी. आघाव यांच्या मार्गदर्शनाखाली प्लेसमेंट सेलचे अध्यक्ष प्रो. सत्यजित कांबळे यांनी सूक्ष्म नियोजन केले होते. याकामी प्रशिक्षण आणि प्लेसमेंट अधिकारी आरती कागवाडे, प्लेसमेंट समन्वयक श्रीमती श्रुती कोळी आणि प्लेसमेंट सेल कमिटीच्या सर्व सदस्यांनी सक्रिय सहभाग नोंदवून हा मेळावा यशस्वी केला.



**पनवेल : शेडूंग येथे हनुमान जन्मोत्सव आणि अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांनी भेट देत दर्शन घेतले. आयोजकांच्या वतीने त्यांचे स्वागत करण्यात आले. सोबत पनवेल पंचायत समितीचे उपसभापती भूपेंद्र पाटील, युवा मोर्चा विभागीय अध्यक्ष योगेश लहाने आदी.**

## लिमये महाविद्यालयात ओरिएंटेशन एफडीपी कोर्स

**कळंबोली :** सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या शिक्षण महर्षी दादासाहेब लिमये आर्ट्स, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, कळंबोली आणि डॉ. हरिसिंह गौर विद्यापीठ, सागर (मध्यप्रदेश) येथील यूजीसी–मालवीय मिशन टीचर ट्रेनिंग सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित एनईपी २०२० ओरिएंटेशन ॲण्ड सेन्शिटायझेन प्रोग्रॅम हा दोन आठवड्यांचा प्राध्यापक विकास कार्यक्रम (कोर्स) यशस्वीरित्या पार पडला. या कार्यक्रमामध्ये देशभरातील विविध महाविद्यालयांतील सुमारे १७६ प्राध्यापकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. राष्ट्रीय शिक्षण धोरण–२०२० च्या विविध पैलूंवर तज्ज्ञ मार्गदर्शकांनी सखोल व अभ्यासपूर्ण मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या उद्घाटन सत्रासाठी मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रविंद्र कुलकर्णी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. अध्यक्षस्थानी डॉ. हरिसिंह गौर विद्यापीठाचे कुलगुरू नामनिर्देशित प्रा. दीवाकर शुक्ला होते, तर विशेष अतिथी म्हणून सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षा सौ. गीताताई पालरेचा उपस्थित होत्या. कोर्सचे समन्वयक प्रा. डॉ. बी. बी. जाधव यांनी कार्यक्रमाचा उद्देश स्पष्ट करत विकसित भारताच्या निर्मितीसाठी एनईपी २०२० महत्त्वाची भूमिका बजावणार असल्याचे सांगितले.

## बीसीटी लॉ कॉलेजच्या विद्यार्थ्यांची मुंबई उच्च न्यायालयात शैक्षणिक भेट

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खांदा कॉलनीमधील भागुबाई चांगू ठाकूर (बीसीटी) लॉ कॉलेज येथील ५व्या वर्षाच्या BLS LL.B. तसेच १ल्या वर्षाच्या B.A. LL.B. विद्यार्थ्यांसाठी मुंबई उच्च न्यायालय येथे शैक्षणिक भेट आयोजित करण्यात आली. ही भेट आदरणीय प्राचार्य मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.



या भेटीचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना न्यायव्यवस्थेचे प्रत्यक्ष ज्ञान मिळावे तसेच न्यायालयीन प्रक्रिया आणि कायदेशीर परंपरेबद्दल त्यांची समज वाढवणे हा होता. या भेटीचे यशस्वी आयोजन प्रा. ऐश्वर्या मॅडम, प्रा. नेहा काची मॅडम आणि प्रा. अनाम मॅडम यांच्या प्रभावी समन्वयातून करण्यात आले.

भेटीदरम्यान विद्यार्थ्यांना विविध न्यायालयीन कक्षांना भेट देण्याची संधी मिळाली. येथे त्यांनी सुरू असलेल्या खटल्यांची कार्यवाही प्रत्यक्ष पाहिली. यामुळे विद्यार्थ्यांना न्यायालयातील युक्तिवाद, शिस्त आणि कार्यपद्धती यांचा प्रत्यक्ष अनुभव मिळाला. या अनुभवामुळे सैद्धांतिक ज्ञान आणि प्रत्यक्ष कायदेशीर व्यवहार यांमधील अंतर कमी होण्यास मदत झाली.

या भेटीचे एक विशेष आकर्षण म्हणजे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या खटल्याशी संबंधित ऐतिहासिक न्यायालयीन कक्ष होय. या ठिकाणाबद्दल विद्यार्थ्यांनी विशेष रस दाखवला. हे ठिकाण भारताच्या कायदेशीर तसेच स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासातील एक महत्त्वपूर्ण घटक असल्याने विद्यार्थ्यांमध्ये इतिहासाबद्दल अभिमानाची भावना निर्माण झाली.

विद्यार्थ्यांनी उच्च न्यायालयाच्या संग्रहालयाला भेट दिली. तेथील कर्मचाऱ्यांनी न्यायालयाचा इतिहास, स्थापना आणि विकास याबद्दल सविस्तर माहिती दिली. जुन्या नोंदी, छायाचित्रे आणि विविध वस्तूंच्या माध्यमातून न्यायालयाच्या समृद्ध वारशाची विद्यार्थ्यांना ओळख झाली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी उच्च न्यायालयाच्या ग्रंथालयाला भेट दिली. येथे उपलब्ध असलेल्या विविध कायदेशीर पुस्तके, जर्नल्स आणि संदर्भ साहित्यामुळे कायदेशीर संशोधनाचे महत्त्व अधोरेखित झाले.

## विसपुते महाविद्यालयात शिक्षक भरतीसाठी कॅम्पस रिक्रूटमेंट ड्राइव्ह

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आदर्श शैक्षणिक समूह संचलित श्री.बापूसाहेब डी. डी. विसपुते स्कूल अँड कॉलेज, न्यू पनवेल येथे इंग्रजी माध्यमाच्या शाळांसाठी भव्य कॅम्पस रिक्रूटमेंट ड्राइव्ह आयोजित करण्यात येत आहे. रायगड व नवी मुंबई परिसरातील शाळांसाठी ही शिक्षक भरती मोहीम विशेष उपयुक्त ठरणार आहे.

या भरती मेळाव्यात बी.एड., एम.एड. व डी.एड. पात्रता असलेल्या शिक्षकांसह आर्ट शिक्षक व प्री–प्रायमरी शिक्षकांना संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. पात्र उमेदवारांना विविध नामांकित शाळांमध्ये नोकरीच्या संधी मिळणार आहेत. ही भरती मोहीम शनिवार, ११ एप्रिल २०२६ रोजी सकाळी १० वाजता नवीन पनवेल येथील आदर्श, प्लॉट नं. ४१, सेक्टर–१५ येथे आयोजित करण्यात आली आहे.

या उपक्रमाद्वारे जास्तीत जास्त शाळांनी सहभागी होऊन पात्र शिक्षकांची निवड करावी, असे आवाहन आदर्श समुहाचे चेअरमन धनराज विसपुते आणि महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.सीमा कांबळे यांनी केले आहे. तसेच इच्छुक उमेदवारांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहावे, असेही कळविण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी संपर्क क्रमांक: ८८७९३३८८३३, ७८८७५६६५६१, ८६०५१७७५७९, ९९२१७०९२०७, ८०५५७५७४७२, ९८२१७०४३५०.

## आमदार प्रशांत ठाकूर चषक वक्तृत्व स्पर्धेचे पारितोषिक वितरण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कोशिश फाऊंडेशन व पनवेल महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आमदार प्रशांत ठाकूर चषक : वक्तृत्व स्पर्धा २०२५ अंतर्गत आंतरशालेय फेरीचे पारितोषिक वितरण सोहळा नवीन पनवेलमधील सीकेटी विद्यालय येथे उत्साहपूर्ण वातावरणात झाला.





या आंतरशालेय फेरीत विविध शाळांमधून निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या उत्कृष्ट कामगिरीचा गौरव करण्यात आला. यावेळी एकूण १२ ट्रॉफीज तसेच प्रमाणपत्रे मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आली. विद्यार्थ्यांनी सामाजिक, शैक्षणिक, पर्यावरणीय आणि समकालीन विषयांवर आत्मविश्वासाने भाषणे सादर करून उपस्थितांची दाद मिळवली.

कार्यक्रमास नगरसेविका डॉ.अस्मिता घरत, भाजप युवा मोर्चा उत्तर रायगड जिल्हा उपाध्यक्ष गणेश सरवणकर, नवीन पनवेल शहर मंडळ अध्यक्ष मयूर कदम, सरचिटणीस संज्योत शेळके, उपाध्यक्ष अभिजित चव्हाण आदी उपस्थित होते.

यावेळी मुख्याध्यापक संतोष चव्हाण यांनी सांगितले, आमदार प्रशांत ठाकूर चषक वक्तृत्व स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांना विचार मांडण्याचे प्रभावी व्यासपीठ मिळते. अशा स्पर्धांमुळे आत्मविश्वास, संवादकौशल्य आणि नेतृत्वगुण विकसित होतात. कोशिश फाऊंडेशनचा हा उपक्रम निश्चितच स्तुत्य आहे.

शाळा प्रशासनाने कोशिश फाऊंडेशन व आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. या पारितोषिक वितरणामुळे विद्यार्थ्यांना पुढील टप्प्यांसाठी अधिक प्रेरणा मिळाल्याचे स्पष्ट झाले.

## चैत्र महिन्यात गावोगावी यात्रा, पालख्यांना सुरुवात

**उरण : रामप्रहर वृत्त**

दरवर्षी दूरवर असलेल्या प्रियजनांना एकत्र आणून नात्यांची वीण घट्ट करणाऱ्या गाव यात्रांना शुक्रवारी सुरुवात झाली. चैत्र महिन्यात दरवर्षी गावातील गाव देव–देवीच्या जत्रा आणि यात्रांना सुरुवात होते. याची तयारी उरण तालुक्यातील विविध गावांत सुरू झाली आहे.

(प्रातिनिधीक छायाचित्र)



उरणमधील जसखार येथील रत्नेश्वरी, करंजा येथील द्रोणागिरी, डोंगरी येथील अंबादेवी, नवीन शेवा येथील शांतेश्वरी आदी देवींच्या यात्रा या प्रसिद्ध आहेत.

या यात्रांमध्ये सहभागी होण्यासाठी गावाबाहेर नोकरी व्यवसायासाठी गेलेले ग्रामस्थ मोठ्या उत्साहाने हजेरी लावतात. या यात्रांमध्ये गावातील हौशी कलाकार नाटक सादर करतात. यावेळी शासन काठी नाचविण्याचीही प्रथा अनेक गावांत आहे. त्यासाठी ग्रामस्थ महिनाभर मेहनत घेतात. या यात्रांमध्ये मांसाहारी मेजवानी असते. तसेच दोन दोन दिवस चालणारे पालखी उत्सवही असतात. आजच्या आधुनिक काळातही उरणमध्ये शेकडो वर्षांची जत्रा आणि यात्रांची परंपरा कायम आहे.

फुंडे गावची घुरबा देवीची यात्रा ३ एप्रिल रोजी साजरी करण्यात आली. समुद्र किनाऱ्यावर वसलेल्या न्हावा गावाच्या डोंगरातील गावदेवीची यात्रा सुरू आहे. दोन ते तीन दिवस रंगणाऱ्या या यात्रेत पालखी सोहळा पाहण्यासाठी भाविकांची गर्दी उसळते. पालखी मिरवणूक गावभर फिरवण्यात येते. भाविकांच्या उत्साहामुळे देवीची पालखी माघारी मंदिरात येण्यासाठी कधी–कधी ३६ ते ४८ तासांहूनही अधिक कालावधी लागतो.

द्रोणगिरी डोंगराच्या पायथ्याशी असलेल्या द्रोणगिरी देवीची यात्रा ९ व १० एप्रिल रोजी पार पडणार आहे. देवीदेवतांनी सजवलेल्या चित्ररथातुन देवीची पालखी मिरवणूक काढण्यात येणार आहे. तर जसखार ग्रामस्थांची प्रसिद्ध ग्रामदेवता श्री रत्नेश्वरी देवीचा पालखी सोहळा १०, ११, १२ एप्रिल असा सलग तीन दिवस साजरा करण्यात येणार आहे. त्यानंतर गव्हाण गावच्या शांतादेवी आणि नवीन शेवा येथील शांतेश्वरी देवीची यात्रा–पालखी सोहळा ११ व १२ एप्रिल साजरा केला जाणार आहे. जसखार येथील रत्नेश्वरी देवीची यात्रा ही मुंबई, ठाणे व रायगड जिल्ह्यात प्रसिद्ध आहे. त्यामुळे या यात्रेला भाविकांची प्रचंड गर्दी जमते. दरवर्षी अगदी उत्साहात ही यात्रा भरविण्यात येते, अशी माहिती जसखार येथील सामाजिक कार्यकर्ते दीपक ठाकूर यांनी दिली.

चैत्र अमावस्येला कोप्रोली गावची ग्रामदेवता जोगेश्वरी माता व बापुजी यात्रा उत्सव पार पडणार आहे. या यात्रेत उंचच उंच देव काठ्या नाचविण्याची प्रथा आहे. यात्रेतील भाविकांकडून देव काठ्या नाचविण्याचा सोहळा पाहण्यासाठी पंचक्रोशीतील भाविकांची यात्रेला मोठी गर्दी उसळते. हा सोहळा १७ एप्रिल रोजी पार पडणार आहे.

## पत्रकार मयूर तांबडेंना पुरस्कार

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल येथील पत्रकार मयूर तांबडे यांना द ग्रेट पत्रकारिता आयकॉन अवॉर्डने सन्मानित करण्यात आले. आई फाउंडेशन, समृद्धी फाउंडेशन, आणि महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ यांच्या वतीने महाड येथे स्वराज्य भूमी, रायगड गौरव संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. पत्रकारिता क्षेत्रात प्रामाणिकपणे, निष्ठेने आणि ध्येयाने व धाडसाने केलेल्या कार्याची दखल घेत मयूर तांबडे यांना हा पुरस्कार देण्यात आला.



पत्रकार मयूर तांबडे यांनी गेल्या तेरा वर्षांत अनेक वृत्तपत्रात काम केले असून पनवेल आणि ग्रामीण भागातील समस्या सोडवण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांनी पत्रकारिता सोबतच अनेक सामाजिक उपक्रम देखील राबवले आहेत. त्यांच्या या कार्याबद्दल त्यांना यापूर्वी देखील अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. प्रशासनावर त्यांची मजबूत पकड आहे. कोरोना काळात स्वतःचा जीव धोक्यात घालून अनेक गोरगरिबांना मदतीचे वाटप केले. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन महाड येथे झालेल्या कार्यक्रमात मयूर तांबडे यांना द ग्रेट पत्रकारिता आयकॉन अवॉर्डने सन्मानित करण्यात आले.

यावेळी अभिनेते संतोष पाटील, संचालक उदय वाघेरे, आई फाउंडेशनचे विनोद मोरे, समृद्धी पब्लिकेशन्सचे बी एन खरात, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे कोकण अध्यक्ष शैलेश पालकर, रायगड अध्यक्ष राकेश खराडे, उद्योजक मनोज आंग्रे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. या पुरस्काराबद्दल त्यांचे शासकीय, सामाजिक, शैक्षणिक, पत्रकारिता क्षेत्रातून अभिनंदन केले जात आहे.

# चित्रपटाच्या नवीन भागांचा ट्रेंड

बस्स एक पिक्चर सुपर डुपर हिट होऊ देत... त्याच्या वाढत्या उत्पन्नाच्या भराभर ब्रेकिंग न्यूज येऊ देत... त्यावरून सोशल मीडियात रिल पोस्ट होऊ देत... लगोलग एखादा नवीन ट्रेंड आलाच म्हणून समजा. चित्रपटाचं अख्खं जगच यशावर चालते, यशासाठी चालते, यशाच्या शोधात असते. येथे यश हाच जगण्याचा ऑक्सिजन आहे, जो सुपर हिट आहे, ते एकदम फिट्ट आहे, असा सरळ हिशेब. तीच फूटपट्टी.

आदित्य धर दिग्दर्शित 'धुरंदर' पहिला आणि तो सुपर डुपर हिट ठरला म्हणून दुसराही आला, तोच गाजला आणि यांनी उत्पन्नाचे केवढे तरी अफाट आणि अचाट विक्रमही केले. ही झाली कार्पोरेट भाषा. यातील पहिल्या भागात जास्त टर्न आणि ट्विस्ट होते आणि भरगच्च मनोरंजन आहे असे अनेकांचे मत आहे. दुसऱ्या भागात खचाखच जोरदार ॲक्शन दृश्य, रक्तपात, हिंसाचार, हिणकस शिव्या आहेत असेही अनेकांनी आपलं मत व्यक्त केले. या चित्रपटावर सामाजिक, सांस्कृतिक, माध्यम क्षेत्रांतून भरपूर उलटसुलट प्रतिक्रिया उमटली. यावर मराठी चित्रपटसृष्टी गप्प का असाही एक मतप्रवाह आहे.

या सगळ्यात महत्त्वाचं आहे, ते या चित्रपटासाठी रसिकांनी २२९ मिनिटे (अधिक जाहिराती आणि ट्रेलरचा अर्धा तास) वेळ दिला. पहिला धुरंदरही २१४ मिनिटांचा आहे आणि एकदा का रसिकांना चित्रपट आवडला की त्याची लांबी किती हा प्रश्न येतच नाही. 'धुरंदर २'चे तर अनेक शहरांतून चक्क दिवस रात्र खेळ चालले. रात्री अडीच वाजताचा या चित्रपटाचा खेळ असणं आणि त्यालाही हाऊसफुल्ल गर्दीचा प्रतिसाद असणं हे म्हणजे पूर्वीसारखी एकपडदा चित्रपटगृह अर्थात सिंगल स्क्रीन थिएटर्ससारखी

दिवसा तीन खेळ अशी चित्रपटाच्या खेळाच्या वेळेची हुकमी अट नाही. अर्थात, तो काळ वेगळा होता. काही चित्रपटगृहात दिवसा चार खेळ असत इतकेच. आता मल्टीप्लेक्स युगात 'चित्रपटाची वेळ' अमूकच असं काही समीकरण नाही. हादेखील एक रंजक बदलच. मोठा चित्रपट असेल, तर मल्टीप्लेक्समधील चार अथवा पाचही स्क्रीनवरचे जवळपास सगळेच खेळ त्याच चित्रपटाचे, असा मामला. चित्रपट प्रदर्शित करण्यातील ही नवीन संस्कृती आहे.

याच यशोगाथेत आता आणखी एक वैशिष्ट्यपूर्ण गोष्ट, आपला नवीन चित्रपट एकाच वेळेस दोन भागात









आहे हे अगोदरच चित्रपट रसिकांना सांगून टाकावे आणि आपणही अशाच दोन लांबलचक, अधिक लांबलचक चित्रपटाच्या मेकिंगवर फोकस कायम ठेवणे. यात थीमचा विस्तारवाद करण्याचे स्वातंत्र्य.

दिग्दर्शक एस.एस. राजमौली यांनी आपला महाखर्चिक चित्रपट 'वाराणसी' हा असाच दोन भागांत पडद्यावर आणण्याचे जाहीर केले आहे. याला 'धुरंदर'च्या यशाचा प्रभाव म्हटले जाते. या चित्रपटाचं एकूण बजेट एक हजार कोटी रुपये आहे असे म्हटले जाते. चित्रपट निर्मितीत पैसा ओतायचा असतो, मोजायचा नसतो. भरभरून पेपरवर्क, पटकथा आणि संवाद लेखन, अधिकाधिक प्रभावी कला दिग्दर्शन, उच्च दर्जाचे छायाचित्रण, व्हीएफएक्स आणि एआय तंत्रज्ञानाचा भरपूर वापर आणि कौशल्यपूर्ण संकलन या सगळ्यासाठी किमान दीडशे दोनशे जणांचे भलं मोठं युनिट, त्याचे नियोजन. या चित्रपटाचं सर्वच माध्यमातून जगभरातील प्रमोशन, मार्केटिंग आणि प्रदर्शन या सगळ्याचे मिळून हे घसघशीत आणि अमर्याद बजेट आहे. या चित्रपटात महेश बाबू, प्रियांका चोप्रा आणि पृथ्वीराज यांच्या प्रमुख भूमिका आहेत आणि हा चित्रपट हिंदीसह तेलगू, कन्नड, तमिळ आणि मल्याळम भाषांमध्येही डब करून प्रदर्शित होत आहे. पॅन इंडिया चित्रपट संस्कृतीनुसार हे सगळे आहे. सगळा मामला अफाट आणि अचाट आहे. आज मोठा चित्रपट म्हणजे असा प्रचंड मोठा फोकस असतो. 'बाहुबली'ने (२०१४)यशस्वीपणे पेरले ते आता असं फोफावलंय, वाढलंय, विस्तारलंय, रुजलंय. दिग्दर्शक एस.एस. राजमोली यांचे म्हणणे आहे, 'वाराणसी' हा चित्रपट, त्याच्या विषयाची व्याप्ती तीन तासांत मांडता येणार नाही. ते अपुरे आणि अस्पष्ट ठरेल. या गोष्टीला अतिशय सविस्तर मांडायचे तर 'वेळेची अजिबात मर्यादा नको.' दिग्दर्शकाचं आपलं एक व्हिजन अधिकाधिक खुलत जाण्यासाठी संधी हवी. त्यावर काहीच मर्यादा नको. 'येथे दिग्दर्शक दिसतोय' असं कौतुकाने म्हणायचं का?

या ट्रेण्डचे श्रेय दिग्दर्शक अनुराग कश्यपला जाते. आपल्या चित्रपटाच्या विषयात आणि बोलण्यात कमालीचा सडेतोड आणि सुस्पष्ट. त्याने 'गॅग्ज ऑफ वासेपूर'च्या (२०१२) वेळी अगोदरच म्हटलं, हा दोन भागातील चित्रपट आहे. त्यानुसार पहिला भाग (१६० मिनिटे) पडद्यावर आल्यावर काही महिन्यांनी दुसरा भाग (१५९ मिनिटे) प्रदर्शित झाला. प्रचंड हिंसाचार असलेल्या या चित्रपटाला प्रेक्षकांचा प्रतिसाद मिळाला हे महत्त्वाचे. यात एक व्यावसायिक धोका असतो. समजा पहिला भाग रसिकांना आवडला नाही, चित्रपट फ्लॉप शो ठरला, तर दुसरा भाग कधी पाहतोय याची उत्सुकता संपून गेली तर त्यात आश्चर्य नाही. अनुराग कश्यपला आपल्या दिग्दर्शनातील चित्रपटावर विश्वास असतो. तसा तो स्पष्टवक्ताही आहे.

एक चित्रपट, दोन भाग ही कॉन्सेप्ट जुन्या काळात असती तर? राज कपूरने आपल्या दिग्दर्शनातील आर.के. फिल्म या बॅनरचा पहिल्या रंगीत चित्रपट 'संगम' (१९६४) दोन मध्यंतरचा चित्रपट न करता दोन भागाचा केला असता आणि युरोपच्या सौंदर्यातील प्रेमाचा त्रिकोण आणखीन उत्कट प्रेम, गीत संगीताने खुलवला असता. राज कपूर, वैजयंतीमाला आणि राजेंद्रकुमार या अधिकाधिक वाव मिळाला असता.

मग त्याला सुपर डुपर हिट यश मिळाल्याने 'मेरा नाम जोकर' (१९७०) दोन मध्यंतरचा चित्रपट म्हणून प्रदर्शित करण्याने दोन भाग आहेत असे चित्रपटाच्या पूर्वप्रसिद्धीत म्हणतच पडद्यावर आला असता. त्यात नायकाच्या आयुष्यातील विविध टप्प्यांवरील तीन असफल प्रेम प्रकरणे अधिकच रोचक आणि रंजक ठरली असती. गीत संगीताला आणखी वाव मिळाला असता. राज कपूरच्या दिग्दर्शनातील चित्रपटातील गाणी आजही लोकप्रिय आहेत, त्यातील सौंदर्य पडद्यावर खुलवण्यासाठी अधिक संधी मिळाली असती. एक चित्रपट दोन भाग हे पूर्वी हवे होते हो, पण त्या काळातील चित्रपट रसिकांना 'गोष्ट संपली, चित्रपट संपला' असं पाहण्याची सवय आणि आवड होती. आजचा प्रेक्षक व्यावसायिक चौकटीतील नवीन रणनीती स्वीकारत आहे. चित्रपट बदलला, प्रेक्षकही बदलले.

**झूम प्रहर**



**दिलीप ठाकूर**
चित्रपट समीक्षक

आता, तुम्ही म्हणाल, चित्रपटांचे सिक्वेल अर्थात पुढचा भाग पडद्यावर येतोय, तेदेखील असंच काहीसं आहे ना? त्यात पहिला चित्रपट यशस्वी ठरल्यास दुसरा भाग अर्थात सिक्वेल, तोही यशस्वी ठरल्यास आणखी एक सिक्वेल असं आहे आणि अनेकदा तरी चित्रपटाचे मूळ नाव असते, पण त्यात 'गोष्ट पुढे चालत नाही'. त्यात ब्रॅण्ड व्हॅल्यू महत्त्वाची असते. तोही ट्रेण्ड छान सेट झाला आहे.

चित्रपटसृष्टी बदलतेय, त्या बदलांचे स्वागत करायला हवे. त्यातील जे हवेसे वाटेल त्याला चित्रपट रसिक मनापासून स्वीकारतील, बाकीचे पडद्यावर ठेवून व्हॉटसअपवर लक्ष केंद्रित करतील...

चित्रपट एक भाग दोन हा ट्रेंड आता आणखी काही चित्रपटांच्या बाबतीत दिसेल हे नक्की आणि असे दोन भागातील चित्रपट काही वर्षांनी ओटीटीवर दहा भागांची वेबसिरीज म्हणूनही येतील. आजचे नियोजन हे उद्याचे व्यावसायिक रणनीती असते. आज चित्रपट उद्योग हा बराचसा कार्पोरेट क्षेत्रात एक महत्त्वाचा फंडा आहे, त्यामुळे त्याच्या रचनेत विक्री मूल्य जास्त महत्वाचे असेल तर त्यात आश्चर्य ते काय? चित्रपट म्हणजे माध्यम आणि व्यवसाय याची सांगड ही पारंपरिक व्याख्या झाली, आता चित्रपट म्हणजे कला, व्यावसायिक चातुर्य आणि विक्री मूल्य यांची अधिकाधिक सांगड असं आहे. एका नवीन वळणावर चित्रपट पोहचला आहे... त्यात व्हीएफएक्स आणि एआय तंत्रज्ञानाचा वापर आहेच, पण त्याचबरोबर एक चित्रपट दोन भाग असाही एक फंडा आहे.

गमतीत म्हटले जाते की, चित्रीकरण केलेले कोणतेही फुटेज वाया का घालवा? त्याचा सदुपयोग करून पैसा कमवूया या व्यावहारिक दृष्टिकोनातून हे घडत आहे. रमेश सिप्पीला हे सगळे फळले असतं हो. शोले, शान, शक्ती, सागर या चित्रपटाचं त्यांने केवढे तरी चित्रीकरण केले. अचूकतेच्या हव्यासापायी ते झाले आणि अधिकाधिक गोष्टी सांगण्यातून ते होत गेले. शोले चित्रपट एक भाग दोन हे त्याला सहज शक्य होते आणि त्याने ते अतिशय आवडीने केले असते.

एकीकडे ऑनलाईनच्या काळात म्हटले जाते की, काय ते थोडक्यात मांडा, एसएसएस करा आणि दुसरीकडे पहावे तर साडेतीन चार तासांचा चित्रपट पाहण्याची मानसिकता आहे. अशा वेळी शंभर, सव्वाशे मिनिटांच्या चित्रपटांचे काय?

---

# वन व्यवस्थापनाची वाटचाल डिजिटल दिशेने

महाराष्ट्र वन विभागाने गेल्या १५० दिवसांत डिजिटल तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करत प्रशासनाच्या कार्यपद्धतीत लक्षणीय बदल घडवून आणले आहेत. नागरिकाभिमुख सेवा, पारदर्शकता, तक्रार निवारण, डेटा व्यवस्थापन आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर या सर्व बाबींमध्ये विभागाने उल्लेखनीय कामगिरी करत शासनाच्या ई–गव्हर्नन्स धोरणाला गती दिली आहे. या कालावधीत विभागाने केवळ सेवा वितरण सुधारले नाही, तर पर्यावरण संवर्धन आणि वन व्यवस्थापनातही तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून एक आदर्श निर्माण केला आहे.

राज्य शासनाच्या १५० दिवसांच्या ई–गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमात महाराष्ट्र वन विभागाने उल्लेखनीय कामगिरी करत मंत्रालयीन विभागात राज्यात दुसरे स्थान पटकावले. विभागाला २०० पैकी १७१.५ गुण मिळाले असून डिजिटल कारभारात तो अग्रगण्य विभागांपैकी एक ठरला आहे. या यशाबद्दल वन विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर यांचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन विशेष गौरव करण्यात आला.

वन विभागाचे संकेतस्थळ हे आधुनिक, सुरक्षित आणि सर्वसमावेशक बनविण्यात आले आहे. संकेतस्थळाचा लोडिंग वेळ पाच सेकंदांपेक्षा कमी ठेवण्यात यश आले असून, मोबाइल, टॅबलेट आणि संगणक या सर्व माध्यमांवर ते सुलभपणे कार्यरत आहे. विविध ब्राउझरवरही ते सुरळीत चालते, ही बाब विशेष महत्त्वाची आहे. संकेतस्थळावर मराठी आणि इंग्रजी या दोन्ही भाषांमध्ये माहिती उपलब्ध करून देण्यात आली आहे, त्यामुळे सर्व स्तरातील नागरिकांना त्याचा लाभ घेता येतो. संकेतस्थळावर दरमहा सुमारे १.८६ लाख वापरकर्ते भेट देत असल्याचे आकडेवारीतून स्पष्ट होते, ज्यातून त्याची उपयुक्तता अधोरेखित होते.

सुलभता आणि सर्वसमावेशकता यावर विशेष भर देण्यात आला आहे. संकेतस्थळावर स्क्रीन रीडर, टेक्स्ट रिसाइज, कीबोर्ड नेव्हिगेशन यासारख्या सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. दिव्यांग नागरिकांसाठीही संकेतस्थळ सहज वापरता येईल, याची काळजी घेण्यात आली आहे. यासोबतच सायबर सुरक्षा आणि प्रमाणपत्रांच्या दृष्टीनेही संकेतस्थळाने उच्च मानके पूर्ण केली आहेत. सर्ट–इन मान्यताप्राप्त सायबर सुरक्षा तपासणी आणि जीआयजीडब्ल्यू मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करण्यात आले आहे, ज्यामुळे नागरिकांचा विश्वास वाढला आहे.

वन विभागाच्या कामकाजात पारदर्शकता आणण्यासाठी संकेतस्थळावर 'सिटिझन चार्टर', आरटीआय विभाग, 'व्हॉट्स न्यू'

*वन विभागाने ई–गव्हर्नन्स सुधारणा उपक्रमाअंतर्गत राबविलेल्या डिजिटल उपक्रमांमुळे प्रशासनात केवळ तांत्रिक बदल झाले नाहीत, तर कार्यपद्धतीतही आमूलाग्र सुधारणा घडून आली आहे. यामुळे नागरिकांना सेवा मिळण्याची प्रक्रिया अधिक सोपी आणि वेगवान झाली आहे. वन्यजीव संरक्षणासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित प्रणाली, जीआयएस तंत्रज्ञान आणि डेटा ॲनालिटिक्सचा वापर करून आम्ही निर्णय प्रक्रियेला अधिक शास्त्रीय आधार दिला आहे. या सर्व उपक्रमांचा थेट लाभ नागरिकांना मिळत असून पारदर्शक आणि जबाबदार प्रशासनाची दिशा अधिक मजबूत होत आहे.*

**–वनमंत्री गणेश नाईक**

*ई–गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमांमध्ये आम्ही 'डिजिटल फर्स्ट' या दृष्टीकोनातून काम करत सेवा वितरण, तक्रार निवारण आणि अंतर्गत प्रशासन या तिन्ही स्तरांवर सुधारणा केल्या आहेत. नागरिकांच्या अभिप्रायाचा आणि तक्रारींच्या डेटाचा अभ्यास करून धोरणात्मक निर्णय घेतले जात आहेत. यामुळे केवळ कार्यक्षमता वाढली नाही, तर सेवा अधिक अचूक, पारदर्शक आणि परिणामकारक बनल्या आहेत. आगामी काळातही तंत्रज्ञानाचा अधिक व्यापक वापर करून वन व्यवस्थापन आणि नागरिक सेवा अधिक सक्षम करण्यावर आमचा भर राहील.*

**–मिलिंद म्हैसकर,** अपर मुख्य सचिव, वन विभाग, महाराष्ट्र शासन



सेक्शन आणि विविध शासकीय निर्णयांची माहिती नियमितपणे अद्ययावत करण्यात येते. नागरिकांना आवश्यक माहिती सहज मिळावी यासाठी सर्च सुविधा, व्हॉइस–टू–टेक्स्ट शोध आणि साइटमॅप यासारख्या सुविधा देण्यात आल्या आहेत. त्यामुळे नागरिकांना माहिती शोधणे अधिक सोपे झाले आहे.

सेवा वितरणाच्या बाबतीत वन विभागाने मोठी झेप घेतली आहे. विभागाकडून एकूण ३२ सेवा उपलब्ध करून देण्यात येतात, त्यापैकी १३ सेवा लोकसेवा हक्क अधिनियमनाअंतर्गत अधिसूचित असून त्या सर्व ऑनलाइन पद्धतीने उपलब्ध आहेत. 'आपले सरकार' पोर्टलशी एकत्रीकरण केल्यामुळे नागरिकांना घरबसल्या अर्ज करणे, त्याची स्थिती तपासणे आणि सेवा मिळवणे शक्य झाले आहे. या सेवांमध्ये तेंदू व्यापारी नोंदणी, वन्यजीवांमुळे झालेल्या नुकसानीसाठी भरपाई, सॉ मिल परवाना नूतनीकरण, संरक्षित क्षेत्रात छायाचित्रण परवानगी यासारख्या महत्त्वाच्या सेवांचा समावेश आहे.

या कालावधीत वन विभागाकडून सुमारे १.६३ लाख अर्जांची यशस्वी पूर्तता करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, नागरिकांकडून पहिल्या किंवा दुसऱ्या स्तरावरील अपिलांची संख्या शून्य असल्याचे दिसून येते, यावरून सेवा वितरणातील कार्यक्षमता स्पष्ट होते. याशिवाय, ८९७ कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले असून, सर्व कर्मचाऱ्यांनी डिजिटल प्रणाली आत्मसात केल्याचे दिसून येते.

तक्रार निवारण व्यवस्थेतही वन विभागाने प्रभावी कामगिरी केली आहे. जवळपास ९९८ तक्रारींचे निराकरण करण्यात आले असून, त्यापैकी अनेक तक्रारींचे वेळेत निवारण करण्यात आले आहे. एस्कलेशनची सुविधा उपलब्ध करून दिल्यामुळे नागरिकांना तक्रारींचा पाठपुरावा करणे सोपे झाले आहे. तक्रार निवारणानंतर नागरिकांकडून मिळालेला सरासरी अभिप्राय ८.७१ इतका असून यावरून नागरिकांचे समाधान दिसून येते.

वन विभागाने डेटा ॲनालिटिक्सचा प्रभावी वापर करून निर्णय प्रक्रियेला गती दिली आहे. रेट्रोस्पेक्टिव्ह, इन्फरेंशियल आणि प्रेडिक्टिव्ह ॲनालिटिक्सचा वापर करून तक्रारींचे विश्लेषण करण्यात येते आणि त्यानुसार धोरणात्मक निर्णय घेतले जातात. यामुळे समस्यांचे मूळ कारण ओळखून त्यावर दीर्घकालीन उपाययोजना करता येतात.

ई–ऑफिस प्रणालीमुळे विभागाच्या अंतर्गत कामकाजात मोठी सुधारणा झाली आहे. ई–ऑफिसद्वारे १४,५५३ फाईल्स तयार करण्यात आल्या असून त्यापैकी ४,०६३ फाईल्स निकाली काढण्यात आल्या आहेत. फाईल प्रक्रियेतील टप्प्यांची संख्या चारवरून तीनपर्यंत कमी करण्यात आली आहे, ज्यामुळे निर्णय प्रक्रियेला वेग आला आहे. डिजिटल पद्धतीने फाईल व्यवस्थापन केल्यामुळे पारदर्शकता आणि कार्यक्षमता वाढली आहे.

डॅशबोर्ड प्रणालीमुळे विभागाच्या कामकाजावर प्रभावी नियंत्रण ठेवणे शक्य झाले आहे. विविध योजनांची प्रगती, वृक्षलागवड, बांबू मिशन आणि राज्यस्तरीय प्रकल्पांचे निरीक्षण एका ठिकाणी करता येते. मुख्यमंत्री डॅशबोर्डशी एकत्रीकरण केल्यामुळे वरिष्ठ स्तरावरून देखरेख सुलभ झाली आहे.

नागरिकांशी संवाद साधण्यासाठी व्हॉट्सॲप चॅटबॉटचा प्रभावी वापर करण्यात आला आहे. मराठी आणि इंग्रजी या दोन्ही भाषांमध्ये कार्यरत असलेला हा चॅटबॉट केवळ तीन टप्प्यांत नागरिकांना आवश्यक माहिती उपलब्ध करून देतो. विविध योजनांबाबत जनजागृती करण्यासाठी या माध्यमाचा उपयोग करण्यात आला आहे.

वन व्यवस्थापनातही तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्यात आला आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आधारित बिबट्या ट्रॅकिंग, ताडोबा येथे व्हर्च्युअल वॉल, आग शोध प्रणाली आणि मार्व्हल यासारख्या उपक्रमांमुळे वन्यजीव संरक्षण आणि आपत्ती व्यवस्थापन अधिक सक्षम झाले आहे. जीआयएस प्रणालीच्या वापरामुळे वनक्षेत्राचे अचूक मॅपिंग आणि नियोजन करता येत आहे.

महाराष्ट्र वन विभागाने १५० दिवसात केलेल्या कामगिरीतून प्रशासनातील डिजिटल परिवर्तनाची प्रभावी अंमलबजावणी कशी करता येते, याचे उत्तम उदाहरण घालून दिले आहे. या उपक्रमांमुळे सेवा वितरण अधिक वेगवान, पारदर्शक आणि नागरिकाभिमुख झाले असून, पर्यावरण संवर्धनालाही चालना मिळाली आहे. भविष्यातही तंत्रज्ञानाच्या साहाय्याने वन व्यवस्थापन अधिक सक्षम करण्याचा विभागाचा निर्धार दिसून येतो.

**–नंदकुमार बलभीम वाघमारे,**
वरिष्ठ सहायक संचालक,
माहिती व जनसंपर्क
महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई

---

# महान समाजसुधारक पंडिता रमाबाई



पंडिता रमाबाई या भारताच्या इतिहासातील एक महान समाजसुधारक, शिक्षणतज्ज्ञ आणि स्त्री–हक्कांच्या पुरस्कर्त्या होत्या. त्यांचा जन्म २३ एप्रिल १८५८ रोजी कर्नाटक राज्यातील गंगामूल येथे झाला. त्यांच्या वडिलांचे नाव अनंतशास्त्री डोंगरे होते, जे संस्कृत पंडित होते. त्यांनी आपल्या कन्येला लहानपणापासूनच शिक्षण दिले. त्या काळात स्त्रियांना शिक्षण मिळत नसे, मात्र रमाबाई यांना त्यांच्या वडिलांमुळे वेद–उपनिषदे व संस्कृत ग्रंथांचे ज्ञान मिळाले.

**शिक्षण आणि समाजसुधारक प्रवास**

पंडिता रमाबाई यांना लहानपणीच आई–वडिलांचा आणि नंतर भावाचाही मृत्यू झाल्यामुळे त्यांनी मोठ्या संकटांचा सामना केला. त्यांनी आपले जीवन शिक्षणप्रसार आणि स्त्रीसक्षमीकरणासाठी वाहून घेतले. त्यांच्या विद्वत्तेमुळे त्यांना पंडिता आणि सरस्वती ही बिरुदे लाभली. त्या भारतातील पहिल्या स्त्रींपैकी एक होत्या, ज्यांनी स्त्रियांना शिक्षण मिळाले पाहिजे, असे ठामपणे मांडले.

त्या काळात विधवांचे जीवन अत्यंत हलाखीचे होते. समाजात विधवांवर होणाऱ्या अत्याचारांविरोधात त्यांनी आवाज उठवला. त्यांनी इंग्लंड आणि अमेरिका येथे जाऊन स्त्रियांच्या शिक्षणाबाबत अध्ययन केले आणि भारतात सुधारणा घडवण्याचा निश्चय केला.

**शारदा सदन आणि स्त्रीशिक्षण**

१८८९ साली पंडिता रमाबाई यांनी पुण्यात शारदा सदन या संस्थेची स्थापना केली. ही संस्था विशेषतः विधवा आणि निराधार महिलांसाठी होती. येथे त्यांनी स्त्रियांना शिक्षण आणि स्वावलंबनाचे धडे दिले. त्यांच्या प्रयत्नांमुळे अनेक स्त्रिया शिक्षित झाल्या आणि स्वातंत्र्याने आपले जीवन जगू लागल्या. यानंतर, त्यांनी मुंबईत आर्य महिला समाज

स्थापन केला, जो हिंदू विधवांच्या पुनर्वसनासाठी कार्यरत होता. तसेच त्यांनी कर्नाटक आणि महाराष्ट्रातील अनेक भागांत महिला शिक्षण आणि समाजसुधारणेचे कार्य केले.

**लेखन कार्य**

पंडिता रमाबाई यांनी आपल्या जीवनप्रवासावर आधारित अनेक ग्रंथ लिहिले. त्यांचे स्त्रीधर्म–नीति आणि द हाय कास्ट हिंदू वुमन हे ग्रंथ विशेष प्रसिद्ध आहेत. या ग्रंथांमध्ये त्यांनी स्त्रियांच्या शिक्षणाच्या आणि सामाजिक स्थितीच्या प्रश्नांवर प्रकाश टाकला. त्यांच्या लेखनामुळे जागतिक स्तरावर भारतीय स्त्रियांच्या परिस्थितीची जाणीव निर्माण झाली.

**योगदान आणि वारसा**

पंडिता रमाबाई यांनी आपले संपूर्ण जीवन स्त्रिया आणि उपेक्षित घटकांच्या उन्नतीसाठी समर्पित केले. ५ एप्रिल १९२२ रोजी त्यांचे निधन झाले, पण त्यांचे कार्य आजही अनेक सामाजिक संस्था आणि शिक्षणप्रेमी पुढे नेत आहेत. त्यांचे योगदान भारतीय स्त्रीसक्षमीकरणाच्या इतिहासात अजरामर राहील.

पंडिता रमाबाई यांनी प्रतिकूल परिस्थितीतही समाजसुधारणेची चळवळ पुढे नेली. त्यांनी शिक्षण, विधवा पुनर्वसन आणि स्त्री–हक्कांसाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले. भारतीय स्त्रियांच्या मुक्तीसाठी त्यांचे कार्य प्रेरणादायी आहे. त्यांच्या प्रयत्नांमुळे आज भारतीय महिलांना शिक्षण आणि समान हक्क मिळाले आहेत. (साभार : इंटरनेट)

# माणगावला निधी देणार -मंगेश वाकडीकर

## उसर बुद्रुक येथील जोडरस्त्याचे उद्‌घाटन

**माणगाव : प्रतिनिधी, बातमीदार**

रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांच्या हस्ते माणगाव तालुक्यातील साई पंचायत समिती गणातील उसर बुद्रुक येथील जोडरस्त्याचे उद्‌घाटन उत्साहाच्या वातावरणात २ एप्रिल रोजी झाले.



यावेळी बोलताना जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांनी सांगितले की, रायगड जिल्हा परिषदेच्या माध्यमातून दुर्गम भागातील वाड्या वस्त्यांवरील आजवर राहिलेला विकासाचा अनुशेष भरून काढणार असून भारतीय जनता पक्षाने महायुतीच्या माध्यमातून माझ्यासारख्या कोणतीही मोठी राजकीय पार्श्वभूमी नसलेल्या कार्यकर्त्याला जिल्हा परिषदेचा अध्यक्ष केले आहे ते समाजातील शेवटच्या घटकांपर्यंत विकास पोहोचवण्यासाठी त्यामुळेच आपण तब्बल १७५ कोटींचा वार्षिक अर्थसंकल्प सादर केला असून भविष्यामध्ये सर्व प्रलंबित कामे मार्गी लावणार असल्याचे त्यांनी सांगितले.

माणगाव तालुक्यामध्ये व परिसरात निलेश थोरे व त्यांचे सहकारी संघटनावाढीकरिता मेहनत घेत आहेत त्यांना लागेल ते पाठबळ देण्यासाठी आम्ही त्यांच्या पाठीशी ठाम उभे आहोत.त्यामुळे भाजपाच्या सर्व कार्यकर्त्यांनी निश्चिन्त रहावे. यावेळी त्यांनी जिल्हा परिषदेच्या कल्याणकारी व सर्वसमावेशक असणाऱ्या बजेटमधील प्रमुख योजना व तरतुदी सांगितल्या. यावेळी बोलताना भाजपा युवमोर्चा जिल्हाध्यक्ष निलेश थोरे म्हंटले की, रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष आपल्या उसर गावामध्ये येण्याची इतिहासातील ही पहिलीच वेळ आहे त्यामुळे हे आपल्या तालुक्याचे व गावाचे भाग्य आहे. जिल्हा परिषद अध्यक्ष जेव्हा एखाद्या गावाला भेट देत असतात तेव्हा खऱ्या अर्थाने जिल्ह्याची विकासाची तिजोरी आपल्या गावात येत असते त्यामुळे आपली प्रलंबित विकासकामे पूर्ण होतील याबद्दल आता शंका राहिलेली नाही.जेव्हा उसर बुद्रुक गावाचा भाजपामध्ये पक्षप्रवेश झाला, त्यावेळेस त्यांना या जोडरस्त्याचा शब्द पक्षातर्फे देण्यात आला होता व पक्षप्रवेशाच्या तिसऱ्या दिवशीच सर्व वरिष्ठ भाजप नेत्यांनी प्रशासकीय मान्यता आपल्याला सुपूर्द केली याचा अर्थ असा की, भारतीय जनता पक्ष ही सर्वसामान्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी युद्धपातळीवर काम करत असते,त्यामुळे ग्रामस्थांनी सुचवलेली उर्वरित विकासकामेदेखील लवकरात लवकर पूर्ण करण्यात येतील.

यावेळी भाजप माणगाव तालुकाध्यक्ष परेश सांगळे, संजय आप्पा ढवळे, महिला तालुकाध्यक्ष रचना थोरे, महिला मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष रुपाली कासारे, तालुका सरचिटणीस किसन महाडिक, बाबुराव चव्हाण, उपाध्यक्ष सुधीर म्हामुणकर, युवा नेते संतोष यादव, अनिल दांडेकर, पोटनेर ग्रामपंचायत सदस्य श्रद्धा यादव, अश्विनी अशोक कान्हेरे ग्रा.पं.सदस्या काकळ, सारिका जाधव ग्रा.पं.सदस्या काकळ, गजानन रिकामे ग्रा.पं.सदस्य काकळ, युवामोर्चा तालुकाध्यक्ष योगेश खडतर, आत्माराम डवले, समीर बक्कम,निखिल साळुंखे, महादेव कदम, अमोल पवार, विजय भोनकर, गजानन भोनकर, उसर गांव अध्यक्ष अशोक कान्हेरे, वसंत कुशाबा निगडे, मुंबई अध्यक्ष, मनोहर निगडे, मनोहर गणपत कातुर्डे, सुरेश कातूर्डे, जितेंद्र आत्मराम पवार, प्रफुल्ल अनंत कातुर्डे, चंद्रकांत राम निगडे, संतोष गजानन निगडे व ग्रामस्थ, महिला मंडळ,मुंबईकर मंडळ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तळा शहरात शिवसृष्टी बांधण्याची मागणी

**तळा : प्रतिनिधी**

तळ्याची भूमी ही छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेली भूमी असून या भूमीत तळगड हा किल्ला असून या गडावरती गडाचा इतिहास जाणण्यासाठी पर्यटक व इतिहासकार भेट देत असतात, मात्र एवढा इतिहास लाभलेल्या तळा शहरात शिवसृष्टी निर्माण करावी, अशी मागणी नागरिकांतून जोर धरू लागली आहे. त्यामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा व अनेक इतिहासाच्या आठवणी जागृत होतील असे शिल्प तसेच सुशोभीकरण करून सुदंर अशी फुलझाडे,शोभेची वृक्ष लागवड व सुंदर असा बगीचा निर्माण करून शिवसृष्टी निर्माण करण्याची मागणी शिवभक्तांकडून होत आहे.

ही शिवसृष्टी निर्माण केल्यास तळा शहराच्या पर्यटनामधे वाढ होऊन शिवभक्त मोठ्या प्रमाणात येथे येतील तसेच विद्यार्थांच्याही सहली येतील व येथे इतिहास व निसर्गाचा आनंद घेता येईल म्हणून तळा शहरामध्ये शिवसृष्टी निर्माण करावी अशी मागणी होत असून शासनाने त्यासाठी निधी व जागा उपलब्ध करून शिवसृष्टी निर्माण करावी, अशी अपेक्षा होताना पहावयास मिळत आहे.

# मोफत आयुर्वेदिक चिकित्सा शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**कर्जत : प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज मंडळ पाटील आळी कर्जत यांच्या वतीने माजी आमदार स्व. तुकाराम सुर्वे प्रतिष्ठान, कर्जत, दादर – मुंबईतील ज्योविस आयुर्वेद आणि नारी सामाजिक संस्था यांच्या सहकार्याने मोफत आयुर्वेदिक चिकित्सा शिबिर व मोफत औषधे वाटप शिबिराचे आयोजन केले होते. या चिकित्सा शिबिरात ३०२ रुग्णांची तपासणी करून त्यांना मोफत औषधे देण्यात आली.

या शिबिराचे उद्‌घाटन ज्योविस आयुर्वेदाचे डॉ. राज सातपुते यांच्या हस्ते यांच्या हस्ते करण्यात आले. डॉ. ज्योती सातपुते, नगरसेवक महेंद्र चंदन, राजाभाऊ कोठारी, मंडळाचे अध्यक्ष गजानन गुरव, अशोक शिंदे, दत्तात्रेय म्हसे, पंछी गुप्ता, हरीशचंद्र राऊत, संतोष पिंगळे, प्रतिष्ठानचे अध्यक्ष मुकेश सुर्वे, मनीषा सुर्वे आदी उपस्थित होते. गुरव यांनी उपस्थितांचे स्वागत केले. रुग्ण तपासणीचे काम डॉ. प्राची तावडे, डॉ. एकता जाखर, डॉ. मिकी सिंग, डॉ. पूजा गुप्ता, डॉ. निधी जाधव, डॉ. श्रेयस सदावर्ते, डॉ. निकिता सानप, डॉ. प्रियांका वैश, डॉ. भूमिका परदेशी, डॉ. सौरभ कुशवाह, डॉ. पूर्वेश डांगे, डॉ. यश भाती, डॉ. अदिती ओझा, डॉ. अदिती गायकवाड, डॉ. आरती गाटे, आयेशा वाडेकर, कल्पना भानुशाली, कृष्णा जानवी, भाविका वरळीकर यांनी केले.

यावेळी माजी नगराध्यक्ष वनिता म्हसे, नगरसेवक प्रशांत पाटील, कुमेश मोरे, पांडुरंग देशमुख, ज्योती पाटील, योगेश देशमुख, वसुधा ठाकूर, पद्मजा देशमुख, पूजा वैद्य, विजया पाटील, सानिका सावंत, राजेश ओसवाल, मोहन भोईर, दिनेश दगडे, संतोष गुरव, सुनील परदेशी, राजू मोरे, अर्चना परांजपे, राजू कानिटकर, मलेश भोईर, किशोर जाधव, किरण पाटील आदी उपस्थित होते.

# यशवंत साबळेंचा वाढदिवस धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक कार्यक्रमांनी साजरा

**खालापूर : प्रतिनिधी**

आमदार प्रशांत ठाकूर हे पर राज्यातील दौऱ्यावर असतानाही भ्रमणध्वनीद्वारे यशवंत साबळे यांना संपर्क करून वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. आपण यशस्वी व्हाल उत्तर आरोग्य संपन्न जीवन जगून खोपोली च्या विकासातील महामेरू व्हाल अशी ईश्वर चरणी प्रार्थना केली. तर खासदार बारणे यांनी ही भेट वस्तू देऊन यशवंत शेठ यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.




भाजपाचे ज्येष्ठ नेते, सामाजिक कार्यकर्ते आणि यशस्वी उद्योजक यशवंत साबळे यांचा वाढदिवस उत्साहपूर्ण आणि आनंदमय वातावरणात साजरा करण्यात आला. या मंगल प्रसंगी समाजातील विविध स्तरांतील मान्यवरांनी उपस्थित राहून त्यांना शुभेच्छांचा वर्षाव केला. खोपोली नगर परिषदेचे नगराध्यक्ष कुलदीप शेंडे यांनी प्रत्यक्ष भेट देत यशवंतशेठ साबळे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. त्यांच्या या सदिच्छा भेटीने कार्यक्रमाला विशेष ऊर्जित वातावरण प्राप्त झाले.

यावेळी खालापूर पंचायत समितीचे उपसभापती रघुनाथ शिंदे, खोपोली नगरपरिषदेचे उपनगराध्यक्ष विक्रम साबळे, सभापती, नगरसेवक, शिवसेना महिला आघाडीच्या पदाधिकारी तसेच इतर मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. सामाजिक बांधिलकी, नेतृत्वगुण आणि उद्योजकीय दृष्टिकोन यांचा संगमअसलेल्या यशवंतशेठ साबळे यांनी आपल्या कार्यातून समाजात वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या कार्याचा प्रभाव आणि योगदान यामुळेच त्यांना सर्व स्तरांतून सन्मान आणि प्रेम मिळत आहे.

खोपोली खालापूर पोलीस अधिकारी व कर्मचारी तसेच खोपोली मुख्याधिकारी यांनी ही उपस्थित रहात यशवंत शेठ यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. हा वाढदिवस सोहळा केवळ शुभेच्छांचा कार्यक्रम न राहता, समाजातील आपुलकी, सन्मान आणि प्रेरणेचा सुंदर संगम ठरला.

यशवंतशेठ यांनी शुभेच्छा देणाऱ्यांना रिटर्न गिफ्ट म्हणून हनुमान जयंती निमित्त हनुमान चालीसा वाटप केले] तर डबल भजन बारीने वाढदिवस भक्तीमय व उत्साहमय वातावरणात साजरा करण्यात आला. यशवंत शेठ साबळे यांनी आपला वाढदिवस विविध मंदिरांत जात देव देवता, संत याचे दर्शन घेऊन साजरा केला.

# आयफोन परत करून नामदेव वाघमारे यांचा प्रामाणिकपणा

**नागोठणे : बातमीदार**

सुकेळी खिंडीत शुक्रवारी (दि. ३) पहाटे २.३० वाजता झालेल्या खासगी बस चा भीषण अपघातानंतर एक हृदयस्पर्शी घटना समोर आली. अपघातस्थळी उपस्थित असताना आधार फाउंडेशनचे संस्थापक, पोलीस मित्र (महाराष्ट्र पोलीस मृत्युंजय दूत) तसेच भाजपा आदिवासी मोर्चाचे जिल्हाध्यक्ष नामदेव वाघमारे यांना सुमारे दिड लाख रुपये किमतीचा ऍपल आयफोन मोबाईल सापडला.

महागडा मोबाईल स्वतःकडे न ठेवता नामदेव वाघमारे यांनी प्रामाणिकपणा दाखवत तो नागोठणे पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी सचिन कुलकर्णी यांच्याकडे तत्काळ सुपूर्द केला. यावेळी ऐनघर विभागातील सामाजिक कार्यकर्ते सचिन भोसले व कानसई येथील दिलीप भोईर उपस्थित होते.




Rayat Shikshan Sanstha's

**Modern School & Junior College, Vashi**

Sector 07, Vashi, Navi Mumbai,Tal –Thane , 400703, Ph.No. 022-27821346

**SELF FINANCE STAFF RECRUITMENT 2026 - 2027**

**INVITES APPLICATIONS FOR THE FOLLOWING POST**

| Sr. No. | Name of the Post | Qualification | No. of Post | S.C. | S.T. | N.T. A | N.T. B | N.T. C | N.T. D | S.B.C. | O.B.C. | E.W.S. | SEBC | OPEN | TOTAL |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | 13% | 7% | 3% | 2.50% | 3.50% | 2% | 2% | 19% | 10% | 10% | 28% | 100 % |
| 1 | **Principal** | M.A./B.Sc./B.Ed./M.Ed. ( From a Recognized University) (8 Years experience of teaching secondary classes up to Std. X and 3 Years experience in admin) | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 |
| 2 | **Pre-Primary Teacher** (Nursery To Sr. KG.) | B.A./B.Sc./B.com/H.S.C. And Montessori / E.C.C. Ed. /P.T.C | 7 | 1 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 | 1 | 2 | 7 |
| 3 | **Primary Teacher** Std.1st To 4th | D.Ed./B.A. B.Ed./B.Sc. B.Ed./B.Com. B.Ed./ M.Ed. ( From a Recognized University) | 22 | 3 | 2 | 1 | 1 | 1 | 0 | 0 | 4 | 2 | 2 | 6 | 22 |
| 4 | **Secondary Teacher** Std.5th To 10th | B.A.B.Ed./B.Sc.B.Ed./ B.Com.B.Ed M.A. B.Ed /M.Sc. B.Ed /M.com, B.Ed./M.Ed. ( From a Recognized University) | 36 | 4 | 2 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 7 | 4 | 4 | 10 | 36 |
| 5 | **Higher Secondary Teacher** (11th to 12th Science) | M.A.B.Ed./M.Sc.B.Ed/ M.Com.B.Ed. | 6 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 | 1 | 2 | 6 |
| 6 | **Music Teacher** | Sangeet Visharad | 3 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 1 | 3 |
| 7 | **Computer Teacher** | B.Sc(IT/CS)/M.Sc.(IT/CS), BCA /MCA | 4 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 | 0 | 1 | 4 |
| | | **Total** | **79** | **11** | **5** | **2** | **2** | **2** | **1** | **1** | **15** | **9** | **8** | **23** | **79** |

**Subject Wise Requirement For Secondary Section:- Maths , Science**

**Instruction**

1) Candidates who have studied throughout English Medium should apply.
2) Candidates having excellent subject knowledge and **D.Ed. & B.Sc., M.Sc.B.Ed Degree** From Recognized University only need to apply.
3) Application forms are to be taken from the school office from **07/04/2026 to 22/04/2026 Time 11.00 am to 5.00 pm**. Application form fee **Rs.100/-**
4) Originals will be verified at the time of interview, Documents should be self attested.
5) "Last day to submit your CV along with photo copy of your documents and cover letter in the office on **22/04/2026 time 11.00 am to 5.00 pm.**"
6) Application can be sent by mail ID- **modernschool1978@gmail.com** and application form along with application fee to be submitted to the office by hand before the date **22/04/2026**
7) Experienced Teachers will be given first preference
8) Decision of the selection committee would be final
9) Walk-In Interview Candidates form will be accepted on the date of interview **(27/04/2026)** till **11.00 am** only.

Secretary
**Rayat Shikshan Sanstha , Satara**


# खरीवली ग्रामपंचायत बनली जलसमृद्ध!

## देशात प्रथम क्रमांक; अभिनंदनाचा वर्षाव

**चौक : प्रतिनिधी**

जल समृद्ध गाव म्हणून खालापूर तालुक्यातील ग्रूप ग्रामपंचायत खरीवली यांचा देशपातळीवर प्रथम क्रमांक आल्याने या ग्राम पंचायती वर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.राज्यस्तरावर प्रथम क्रमांक मिळाल्यानंतर राष्ट्रीय स्तरावर यश प्राप्त करण्यासाठी सर्वांनी मेहनत घेतली.

केंद्र सरकारच्या पंचायतराज मंत्रालयाच्या सन २०२३/२४ च्या मूल्यांकनात खालापूर तालुक्यातील खरीवली ग्रामपंचायतीने देशपातळीवर प्रथम क्रमांक मिळवला आहे. राज्यस्तरावर प्रथम क्रमांक मिळवल्यानंतर राष्ट्रीय स्तरावरही हे यश संपादन करत ग्रामपंचायतीने ग्राम पंचायत, तालुका, जिल्हा आणि राज्याचा गौरव वाढवला आहे. राज्याचे ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे, प्रधान सचिव एकनाथ डवले, यशदाचे संचालक डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी, गट विकास अधिकारी संदीप कराड यांच्या मार्गदर्शनाखाली 'जलसमृद्ध गाव' अभियानात ही कामगिरी साध्य झाली.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी सरपंच, सदस्य, ग्रामविकास अधिकारी व ग्रामस्थांचे अभिनंदन केले. सरपंच सुंदर रघुनाथ पवार,उपसरपंच सुशांत संतोष विचारे यांच्या नेतृत्वाखाली ग्रामपंचायत अधिकारी सौ.मनाली महेश म्हसे (जोरकर) सर्व सदस्य व कर्मचाऱ्यांनी केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांचा प्रभावी वापर करत जल व्यवस्थापनाचे योग्य नियोजन केले आहे. जल जीवन मिशन,१५ वा वित्त आयोग, जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून पाणीपुरवठा योजना राबविण्यात आल्या.

केंद्रीय समितीच्या पाहणीनंतर खरीवली ग्रामपंचायतीने देशात प्रथम क्रमांक मिळवून राष्ट्रीय स्तरावर आपली छाप पाडली आहे. या यशाबद्दल सर्व स्तरातून खरीवली ग्रामपंचायतीचे अभिनंदन होत असून हा आदर्श इतर ग्रामपंचायतींसाठी प्रेरणादायी ठरणार आहे.

### यशाचे मानकरी

*सरपंच सुंदर पवार, उपसरपंच सुशांत विचारे, सदस्य निलेश शिंदे, निखील पाटील, गोपाळ वाघमारे, स्वस्तिका विचारे, योगिता पाटील, बारकी वाघमारे, देवकी माडे, ग्रामपंचायत अधिकारी मनाली म्हसे, कर्मचारी कल्याणी पवार, गणेश पाटील, संगणक परिचालक अक्षदा परबलकर व सर्व ग्रामस्थ हे खरे यशाचे मानकरी असल्याचे ग्राम पंचायत अधिकारी मनाली महेश म्हसे यांनी सांगितले.*


**श्री भैरवदेव विद्यालय व लोकनेते रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालय, रीटघर, ता. पनवेल जि. रायगड ४१०२०६**

**निविदा सूचना**

रयत शिक्षण संस्थेचे श्री भैरवदेव विद्यालय व लोकनेते रामशेठ ठाकूर उच्च माध्य. विद्यालय, रिटघर – पनवेल, प्रतिष्ठित कंत्राटदारांकडून शाळा इमारतीच्या भिंतीच्या विशेष दुरुस्ती कामासाठी निविदा आमंत्रित करीत आहे.

निविदा विक्रीः ०६/०४/२०२६ सकाळी ११.०० वा. पासून १३/०४/२०२६ सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत (सरकारी सुट्यांव्यतिरिक्त).

सादर करण्याची अंतिम तारीख : १५/०४/२०२६ सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत, श्री भैरवदेव विद्यालय व लोकनेते रामशेठ ठाकूर उच्च माध्य विद्यालय, रिटघर, पनवेल येथे.

| कामाचे नाव | अंदाजित खर्च | कोरी निविदा किंमत |
|---|---|---|
| शाळा इमारतीच्या भिंतीचे विशेष दरुस्ती काम | रु.६,००,०००/– | रु. १,०००/– |

सही/–
मुख्याध्यापक
श्री भैरवदेव विद्यालय आणि लोकनेते रामशेठ ठाकूर उच्च माध्य. विद्यालय, रिटघर

# नवी मुंबईची प्रदूषणमुक्तीकडे वाटचाल

## हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी व्यापक कृती आराखडा मंजूर

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

झपाट्याने विस्तारत असलेल्या शहरात वाढत्या वायू प्रदूषणाच्या पार्श्वभूमीवर नवी मुंबई महानगरपालिकेने १८ महिन्यांचा व्यापक कृती आराखडा गुरुवारच्या महासभेत सर्वानुमते मंजूर केला. पीएम १० आणि पीएम २.५ सूक्ष्म कणांचे प्रमाण कमी करून हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी ३० कोटी रुपयांच्या 'सघनकृती' योजनेची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. एमएमआर क्षेत्रासाठी हा प्रकल्प मार्गदर्शक ठरेल, असा विश्वास महापालिका आणि सभागृह नेते सागर नाईक यांनी व्यक्त केला.

वाढते शहरीकरण, मोठ्या प्रमाणावर सुरू असलेली बांधकामे, वाढती वाहनसंख्या, तसेच रस्त्यांवरील धुळीचा संचय यामुळे प्रदूषणात वाढ होत असल्याची बाब सभागृहात अधोरेखित करण्यात आली. महापौर सुजाता पाटील यांनी नवी मुंबईकरांच्या आरोग्यासाठी 'सघनकृती' ही योजना अत्यंत महत्त्वाची असल्याचे सांगत, हवेची गुणवत्ता नियंत्रित ठेवण्यासाठी आणि प्रदूषणाच्या कारणांवर



थेट उपाययोजना करण्यासाठी महापालिका कटिबद्ध असल्याचे स्पष्ट केले.

सभागृह नेते सागर नाईक यांनी पर्यावरण संरक्षणाला प्राधान्य देत या आराखड्याच्या अंमलबजावणीबाबत स्पष्ट भूमिका मांडली. 'पर्यावरण हा आमच्यासाठी प्राधान्याचा विषय आहे. नवी मुंबई शहराला पर्यावरणपूरक आणि देशातील आदर्श शहर बनवण्याच्या दिशेने या ठरावाद्वारे वाटचाल सुरू केली आहे. शहरातील प्रदूषणाचे मूळच नष्ट करण्याचा आमचा प्रयत्न आहे. केवळ नवी मुंबई महापालिकाच नव्हे, तर मुंबई, ठाणे, पनवेल महापालिका तसेच महाराष्ट्र

> *शहरातील प्रदूषणाचे मूळच नष्ट करण्याचा आमचा प्रयत्न आहे. मुंबई, ठाणे, पनवेल महापालिका तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांची संयुक्त समिती स्थापन करून सर्वांनी सहभागी व्हावे.*
>
> **–सागर नाईक,** सभागृह नेते

प्रदूषण नियंत्रण मंडळ यांची संयुक्त समिती स्थापन करून सर्वांनी सहभागी व्हावे,' असे आवाहन त्यांनी केले.

'प्रदूषण नियंत्रणाचे नियम मोडणाऱ्यांवर कठोर कारवाईसाठी स्वतंत्र नियम तयार करण्यात येतील. तसेच प्रशासनाने या आराखड्याची काटेकोर अंमलबजावणी करून दर महिन्याला प्रगती अहवाल सादर करावा,' अशा सूचनाही त्यांनी दिल्या.दरम्यान, सभेत सदस्यांनी प्रदूषण नियंत्रणासाठी आतापर्यंत राबविण्यात आलेल्या उपाययोजनांची माहिती प्रशासनाकडे मागितली.

अतिरिक्त आयुक्त सुनील पवार यांनी यावर उत्तर देताना, कोविडनंतर वायू प्रदूषणाचा प्रश्न अधिक तीव्र झाला असल्याचे नमूद केले. प्रदूषणास कारणीभूत ठरणाऱ्या आरएमसी प्लांट आणि बांधकाम व्यावसायिकांना नोटिसा बजावून ४ कोटी ६३ लाख रुपयांचा दंड वसूल करण्यात आल्याचे तसेच नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ८२ विकासकांवर १ कोटी ५८ लाख रुपयांचा दंड आकारण्यात आल्याची माहिती दिली.

महापालिकेने विकासकामांच्या ठिकाणी हवा गुणवत्ता निर्देशांक (AQI) मोजणारी यंत्रणा बसविणे बंधनकारक केले असून, प्रदूषण नियंत्रणासाठी प्रमाणित कार्यपद्धती (एसओपी) लागू करण्यात आली आहे. याशिवाय धूळ नियंत्रणासाठी व्हॅक्यूम स्विपिंग मोहीम, बांधकाम क्षेत्रात एअर क्वालिटी प्रणाली सक्तीची करणे आणि उत्सर्जन नियंत्रणासाठी मानके लागू करणे यांसारख्या उपाययोजनांचा समावेश या आराखड्यात करण्यात आला आहे.

# पामबीच मार्गावर अपघाताचे सत्र

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबईतील पामबीच मार्गावर अपघातांचा सिलसिला कायम असून शनिवारी मध्यरात्री झालेल्या अपघातात दोन गाड्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. सुदैवाने यात कोणाचा मृत्यू झाला नसून किरकोळ जखमी झाले आहेत. तर अपघातास कारण असणारे युवक पळून गेले असून त्यांचा शोध वाशी पोलीस घेत आहेत.




नवी मुंबईत शीव पनवेल मार्गाला पर्यायी मार्ग म्हणून वाशी ते सीबीडी असा नऊ किलोमीटरचा बाय पास मार्गाचे निर्माण सिडकोने केले होते हा मार्ग शहरांतर्गत असला तरी एखाद्या महामार्ग सारखा सहा पदरी असून रहदारी कमी असलेला मार्ग आहे, मात्र शहरात गाड्यांचे प्रमाण वाढल्याने आता येथेही गाड्यांची गर्दी दिसून येते मात्र रात्रीच्या वेळी बऱ्यापैकी मोकळा मार्ग असतो. त्यामुळे रात्री सुसाट वेगात गाड्या धावत असतात. या मार्गावर दर काही दिवसांनी होणाऱ्या अपघातामुळे वेगमर्यादा ६० किलोमीटर प्रतितास असावी असा निर्बंध घातला गेला आहे, मात्र रात्रीच्या वेळी हा नियम फारसे कोणी पाळत नाही परिणामी अपघात होत असतात.

असाच अपघात शनिवारी झाला. रात्री सव्वा बारा वाजता पुणे मुंबई मार्गाचा भाग असणाऱ्या शीव पनवेल मार्गावर वाशी येथील जुई उड्डाणपुलाखाली बेलापूर मार्गिकेवर हा अपघात झाला. शीव पनवेल मार्गाच्या वाशीतील जुई उड्डाणपुलाच्या खाली पाम बीच वर मोराज सर्कलच्या दिशीला १०० मीटर अंतरावरील एरेंजा सर्कल ते मोराज सर्कल या दिशेने भरदार वेगाने जाणाऱ्या मारुती स्विफ्ट क्रमांक (एम एच ०३ एआर ९२९८) या गाडीने दुभाजक ओलांडून करून मोराज सर्कल ते एरेंजा ऑरेंज सर्कल अशा जाणाऱ्या गाडी होंडा सिटी (क्रमांक एमएच ४३ सी एम ३२२३ ) या गाडीला ठोकर मारून मारली. यात दोन्ही गाड्यांचे प्रचंड नुकसान झाले आहेत सुदैवाने या अपघातामध्ये कोणीही जखमी नाही. दोन्ही गाड्या टोचन च्या साहाय्याने बाजूला घेवून वाहतूक सुरळीत करण्यात आलेली आहे.

वाशी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक शशिकांत चांदेकर यांनी सांगितले कि अपघातास कारण असणाऱ्या गाडीत काही युवक होते. अपघात झाल्यावर सर्व जण पळून गेले असून त्यान्हा शोध घेतला जात आहे.

# 'लिटिल आयडल किड्स'चा बक्षीस समारंभ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

लिटिल आयडल किड्स नवीन पनवेल या स्कूल चा बक्षीस समारंभ आद्य क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह येथे गुरुवार दिनांक २ एप्रिल रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाला."स्मरण" या संकल्पनेवर आधारित सदर कार्यक्रमाचे आयोजन केले होते आणि या कार्यक्रमाला विद्यार्थी आणि पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

बक्षीस समारंभाच्या या कार्यक्रमाला पनवेल महानगरपालिकेचे नगरसेवक गणेश कडू, पत्रकार उत्कर्ष समितीचे रायगड जिल्हा अध्यक्ष मिलिंद खारपाटील, मुंबई



महानगरपालिकेचे सहाय्यक करनिर्धारक व संकलक एम/पूर्व एन डी खान, संगीत शिक्षक दिपक कदम, अतुल तांबे, विश्वास भगत, लिट्ल आयडल स्कूलच्या प्रिन्सिपॉल पूनम गुप्ता, चेअरमन मनोज गुप्ता, सर्व शिक्षक, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी छोट्या छोट्या बच्चे कंपनीने सुरेख नृत्य करून उपस्थितांची मने जिंकली. टाळ्या आणि वन्स मोअर असा जोरदार प्रतिसाद होता. गणेश कडू यांनी विद्यार्थी आणि शिक्षक यांचे तोंड भरून कौतुक केले. याचबरोबर विद्यार्थ्यांची चांगली तयारी केल्याबद्दल शिक्षकांना धन्यवाद दिले. पालकांनी आता निश्चित राहावे. कारण अतिशय चांगल्या शाळेत तुम्ही मुलांना पाठवले आहे असेही ते म्हणाले. कार्यक्रमाचे सुरेख सूत्रसंचालन शिवांगी तिवारी हिने केले.

# सीकेटी विद्यालयात पदवीदान समारंभ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर विद्यालयाच्या इंग्रजी माध्यम पूर्व प्राथमिक विभागातर्फे मुख्याध्यापिका निलिमा शिंदे व पर्यवेक्षिका वैशाली पारधी यांच्या मार्गदर्शनाखाली शनिवारी (दि.४) वरिष्ठ बालवर्गासाठी पदवीदान समारंभाचे आयोजन करण्यात आले. दरम्यान, प्रमुख पाहुण्या एअर फोर्स स्कूल जामनगरच्या माजी मुख्याध्यापिका, आदर्श शिक्षक पुरस्कार विजेत्या रिटा अमरावत यांच्या हस्ते प्रतिमा पूजन, दीप प्रज्वलन करण्यात आले.

मान्यवरांचे शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. संगीत शिक्षक रुपेश मढवी व संतोष खरे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी सुरेल स्वरात संस्थेचे चेअरमन माजी




खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर साहेब यांच्या प्रती आदर व्यक्त करत त्यांच्या अमृतमहोत्सवी वर्षाचे औचित्य साधून स्वरचित अश्या सुंदर गाण्याचे सादरीकरण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

शाळेच्या मुख्याध्यापिका निलिमा शिंदे यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत त्या पुढे म्हणाल्या की पदवीदान समारंभ हा विद्यार्थ्यांच्या मेहनतीचा सन्मान असून त्यांच्या भविष्यासाठी शुभेच्छा देण्यासाठी केला जातो. तसेच अश्या कार्यक्रमांमधून विद्यार्थ्यांना पुढील आयुष्यासाठी प्रेरणा मिळते. विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील एक टप्पा संपून सुरू होणाऱ्या नवीन टप्प्यासाठी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत मोलाचे मार्गदर्शन केले. त्याचबरोबर प्रमुख पाहुण्या रिटा अमरावत यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभाशीर्वाद दिले.

दरम्यान, सिनिअर के.जी. लोटस ची विद्यार्थिनी सारथी म्हात्रे हिने उपस्थित दादा ताईंसाठी सुंदरसे भाषण सादर केले. त्याचबरोबर ज्युनिअर के. जी. जस्मिन व सनफ्लॉवर च्या विद्यार्थ्यांनी नृत्याचे सादरीकरण करत कार्यक्रमाला चार चाँद लावले. या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी रिटा अमरावत, शाळेच्या मुख्याध्यापिका निलिमा शिंदे व पर्यवेक्षिका वैशाली पारधी तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी त्याचबरोबर पालकांनी विद्यार्थ्यांना शुभाशीर्वाद देत कार्यक्रमाची सांगता झाली.

# बीसीटी लॉ कॉलेजच्या विद्यार्थ्यांची औद्योगिक भेट

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खांदा कॉलनीमधील भागुबाई चांगू ठाकूर (बीसीटी) लॉ कॉलेजतर्फे प्राचार्य मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली आणि मोरेश्वर हॉलिडेज प्रा. लि. यांच्या समन्वयाने आयोजित औद्योगिक भेट १ ते १० मार्च २०२६ या कालावधीत यशस्वीरीत्या पार पडली.




ही सहल ९ रात्री व १० दिवसांची होती. या सहलीमध्ये चंदीगड, मनाली, कसोल आणि अमृतसर या प्रमुख ठिकाणांना भेट देण्यात आली. या भेटीत एकूण १०२ विद्यार्थी तसेच अध्यापन व बिगर-अध्यापन कर्मचारी सहभागी झाले होते.

या प्रवासाची सुरुवात मुंबईतील बांद्रा टर्मिनस येथून दिल्लीकडे रेल्वेने झाली. त्यानंतर दिल्लीहून रस्तामार्गे चंदीगडकडे प्रस्थान करण्यात आले. चंदीगड येथे रॉक गार्डन, रोझ गार्डन आणि सुखना लेक यांसारख्या महत्त्वाच्या ठिकाणांना भेट देण्यात आली. या भेटीद्वारे विद्यार्थ्यांना शहरी नियोजन व पर्यावरणीय सौंदर्य याविषयी उपयुक्त माहिती मिळाली.

यानंतर मनाली येथे प्रस्थान करण्यात आले. येथे विद्यार्थ्यांनी हिमालयाच्या निसर्गसौंदर्याचा आनंद घेतला तसेच रिव्हर राफ्टिंग आणि पॅराग्लायडिंग यांसारख्या साहसी उपक्रमांमध्ये सहभाग घेतला. कुल्लू येथे होळी सण साजरा करण्यात आला, ज्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये सांस्कृतिक ऐक्य व उत्साह निर्माण झाला.

या औद्योगिक भेटीचा एक महत्त्वाचा शैक्षणिक भाग म्हणजे कुल्लू जिल्हा न्यायालय येथे दिलेली भेट होय. यानंतर सोलंग व्हॅली, हिडिंबा देवी मंदिर आणि मॉल रोड या ठिकाणांना भेट देण्यात आली. पुढे कसोल येथे कॅम्पमध्ये राहण्याची व्यवस्था करण्यात आली होती. येथे विद्यार्थ्यांनी निसर्गाच्या सान्निध्यात वेळ घालवला तसेच बोनफायर व विविध गट क्रियाकलापांमध्ये सहभाग घेतला. मणिकरण साहिब येथे भेट देऊन धार्मिक व सांस्कृतिक महत्त्वाची माहिती मिळाली.

सहलच्या शेवटच्या टप्प्यात अमृतसर येथे सुवर्ण मंदिराला भेट देण्यात आली. तसेच जलियांवाला बाग व वाघा बॉर्डर समारंभ पाहून विद्यार्थ्यांमध्ये देशभक्तीची भावना जागृत झाली. या सहलीचे यशस्वी आयोजन करण्यासाठी आदरणीय प्राचार्य मॅडम यांचे मार्गदर्शन लाभले, त्याबद्दल आम्ही मनःपूर्वक आभार व्यक्त करतो. तसेच सर्व प्राध्यापक, कर्मचारी व मोरेश्वर हॉलिडेज प्रा. लि. यांचे उत्कृष्ट नियोजन व समन्वयाबद्दल आम्ही आभारी आहोत.

# नवी मुंबईत कारपेंटरर्सचा भव्य मेळावा उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

देशातील अग्रगण्य लाकडी उत्पादने बनवणाऱ्या कंपनीने सोमवारी नवी मुंबईतील तुर्भे येथील एका हॉटेलमध्ये कारपेंटर्सचा भव्य मेळावा आयोजित केला होता. या मेळाव्यात नवी मुंबई, मुंबई आणि आसपासच्या परिसरातील शेकडो कार पेंटर उपस्थित होते. कंपनीच्या प्रतिनिधींनी कार पेंटरना आपल्या उत्पादनांविषयी सविस्तर माहिती दिली.

यावेळी कंपनीचे जनरल मॅनेजर, मनोज उपाध्याय म्हणाले, आमची कंपनी केवळ उत्पादने तयार करून विकत नाही, तर कार पेंटरना आमच्या कुटुंबातील सदस्य मानते. म्हणूनच आम्ही नवीन कार पेंटरसाठी मोफत प्रशिक्षण कार्यक्रम सुरू केला आहे. या कार्यक्रमांतर्गत मुलांना ९० दिवसांचे प्रशिक्षण आणि प्रमाणपत्र दिले जाते. त्यानंतर त्यांना नोकरीही दिली जाते.

कंपनीच्या महाराष्ट्र राज्याचे डीजीएम, अमन पाल सिंग म्हणाले, भविष्यात प्लायवूडचा वापर बंद होईल. त्यामुळे आमची कंपनी प्लायवूडला पर्याय शोधण्यावर काम करत आहे. आम्ही एक असे उत्पादन विकसित केले आहे,

# पनवेल महापालिकेतर्फे 'रंगोत्सव' चित्रकला प्रदर्शन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका शिक्षण विभाग व आदित्य बिर्ला फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने नुकतेच 'रंगोत्सव' चित्रकला प्रदर्शनाचे उत्साहात आयोजन करण्यात आले.

आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या या कार्यक्रमाला पनवेल महानगरपालिका शिक्षण विभागाचे शिक्षण अधिकारी रमेश चव्हाण, लोकनेते दि.बा. पाटील शाळेचे मुख्याध्यापक व सर्व शिक्षकवृंद यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांचे कौतुक केले. सर्व शिक्षकवृंदाने 'रंगोत्सव' चित्रकला प्रदर्शनात सहभागी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले व भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.



या चित्रकला प्रदर्शनासाठी पनवेल महानगरपालिकेतील सर्व ११ शाळेतील विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी काढलेल्या विविध विषयावरील चित्राचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले. या प्रदर्शनात स्वच्छता, पर्यावरण, महान व्यक्ती, सामाजिक विषय इत्यादी विषयावरती आकर्षक चित्र सादर करण्यात आली.

विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पक चित्रांतून विविध सामाजिक संदेश प्रभावीपणे मांडले. हे पूर्ण प्रदर्शन आदित्य बिर्ला फाऊंडेशनच्या अधिकारी तृष्णा चोपडे व चित्रकलेचे शिक्षक राजेंद्र सोनमळे व अथर्व लांडे तसेच पनवेल महानगरपालिकेतील सर्व ११ शाळेतील सहायक शिक्षक सीमा, रेश्मा थोरात, प्राची पाटील, कविता मोरे, सारीका गुरव, सपना पाटील,आरती बडगुजर, समिक्षा ठाकूर, सिध्दीका नूर या सर्व शिक्षकाचे मोलाचे सहकार्य लाभले.

# विशाखा बडेकर यांना मास्टर्स ऑफ फिजिओथेरपी पदवी प्राप्त

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी पाताळगंगा औद्योगिक परिसरातील वाशिवली येथील बडेकर कुटुंबातील कन्या विशाखा रवींद्र काशिनाथ बडेकर यांनी न्यूरो आणि सायकोसोमॅटिक डिसऑर्डर्स या विषयात मास्टर्स ऑफ फिजिओथेरपी (MPT) ही पदवी यशस्वीरित्या प्राप्त केली आहे. त्यांनी ही दोन वर्षांची पदव्युत्तर पदवी सुमनदिप विद्यापीठ,वडोदरा येथून पूर्ण केली.

विशाखाचे कठोर परिश्रम, जिद्द आणि सातत्यपूर्ण अभ्यासाच्या जोरावर तीने हे यश संपादन केले असल्याचे विशाखा बेडेकर सांगत आहे.विशाखाच्या या उल्लेखनीय यशाबद्दल अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



# नवी मुंबई पालिकेत आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण




**नवी मुंबई : बातमीदार**

महानगरपालिका आपत्ती व्यवस्थापन विभागामार्फत जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, ठाणे यांच्या वतीने, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल व राज्य आपत्ती प्रतिसाद दल यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिका मुख्यालयात 'परिचय सराव आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त सुनील पवार यांनी कोणतेही प्रशिक्षण हे स्वतःला कृतीशील व अद्ययावत ठेवण्यासाठी महत्वाचे असते असे सांगत सर्व सहभागी अधिकारी, कर्मचारी यांनी अत्यंत गांभिर्यपूर्वक प्रशिक्षणातील गोष्टी शिकून घ्याव्यात अस सांगितले.

या प्रशिक्षणाप्रसंगी एनडीआरएफचे मुख्य निरीक्षक सुरेंद्र पुनिया, एसडीआरएफ चे वरिष्ठ निरीक्षक सतीश सिंग, ठाणे जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी डॉ.अनिता जवंजाळ, ठाणे तहसील येथील मंडल अधिकारी मोहन बोंबे, नवी मुंबई अग्निशमन दलाचे सहाय्यक अग्निशमन अधिकारी संदेश चन्ने व नागरी संरक्षण दलाचे विभागीय वॉर्डन अरुण सातपुते आदी उपस्थित होते.

या प्रशिक्षणामध्ये नमुंमपा मधील अधिकारी, कर्मचारी तसेच अग्निशमन विभागाचे कर्मचारी, सुरक्षा रक्षक, नागरी संरक्षण दल, सफाई मित्र व ठाणे तहसील येथील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला होता.

प्रत्यक्ष प्रशिक्षणात एनडीआरएफमार्फत आपत्ती विषयक माहिती देऊन आपत्तीपूर्व व आपत्तीमध्ये घ्यावयाची काळजी याबद्दल योग्य ते मार्गदर्शन करण्यात आले. सीपीआर, बँडेजेस तसेच प्राथमिक स्वरूपात आपत्तीला सामोरे जाण्यासाठी लागणारे प्रशिक्षण याबद्दलची महत्त्वपूर्ण माहिती देऊन प्रशिक्षणार्थींकडून प्रात्यक्षिके करून घेतली. या प्रशिक्षणामध्ये सर्वांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.



# दिनेश शुक्ला यांना पुरस्कार

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी कोन रस्त्यावरील शिवगंगा वॉटर पार्कचे मालक दिनेश अवंधनारायण शुक्ला यांना महाड येथे स्वराज्य भूमी गौरव संमेलनात आदर्श उद्योजक रत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आल्याने त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.


आई फाऊंडेशन भारत, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ व समृध्दी पब्लिकेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या स्वराज्य भूमी गौरव संमेलन सन २०२६ कार्यक्रमात सुप्रसिद्ध अभिनेता संतोष पाटील,पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस विश्वासराव आरोटे,उदय भाऊसाहेब वाघेरे, संचालक, ग्रुप ऑफ कंपनी-पिंपरी पुणे, डॉ. बी. एन. खरात संचालक समृद्धी पब्लिकेशन युवा पुरस्कार विजेते, महाराष्ट्र शासन,डॉ. विनोदराव मोरे संस्थापक अध्यक्ष आई फाउंडेशन, रायगड (भारत) यांच्या हस्ते करण्यात आला. शुक्ला यांनी उद्योगा व्यतिरिक्त सामाजिक कार्यातही आपला ठसा उमटवला आहे.

# साळाव पुलावरून अवजड वाहतुक सुरूच

**रेवदंडा : प्रतिनिधी**

रेवदंडा–साळाव पुलावरून रात्रीसह सकाळी पहाटेपर्यंत अवजड वाहतुक सुरू असल्याने पुलास धोका निर्माण झाला असून प्रवासीवर्ग संप्तत प्रतिक्रिया व्यक्त करत आहेत.

गेले दोन–तीन महिन्यापासून रेवदंडा कुंडलिका समुद्र खाडीत रो–रो सेवेकरिता भराव तसेच समुद्रात जेट्टी उभारण्याचे काम सुरू आहे. या भरावाच्या तसेच समुद्रात जेट्टी कामासाठी रात्रीच्या सुमारास व सकाळी आठ वाजेपर्यंत साळाव पुलावरून अवजड वाहतुक मालट्रकव्दारे होत असते. या पुलास ३५ ते ४० वर्षे पूर्ण झाली असून पूल अवजड वाहतुकीने धोक्यात येवू शकतो. म्हणूनच या पुलावरून



## ● पुलास धोका ; प्रवासीवर्ग संप्तत

सार्वजनिक बांधकाम खात्याने या अगोदरच अवजड वाहतुकीस बंदी असल्याचे म्हटले आहे, मात्र तरीही या पुलावरून २० टन ते २४ टन मालवाहतुक ट्रकव्दारे वाहतूक सुरू असल्याने स्थानिक प्रवासीवर्ग संप्तत झाला आहे.

येथून रात्रीच्या सुमारास दहा टायरचे मालवाहतूक ट्रक ३५ ते ४० टन माल घेवून जा–ये करत असल्याचा आरोपसुध्दा प्रवासीवर्ग करत आहे.

नुकतीच साळाव पुलाचे डागडुजी तसेच इतर महत्वाचे कामे संबधीत खात्याने पुर्ण केली आहेत. त्यासाठी काही महिने पुलावरून अवजड वाहतुक बंद करणेत आली होती. फक्त १२ टन मालवाहतुकीस संबधित खात्याने पुलाचे काम पूर्ण झाल्यानंतर पुलावरून वाहतुकीस परवानगी देण्यात आली होती. साळाव पुलावरून अवजड मालवाहतुक अशीच सुरू राहीली तर पुलास धोक्याची संभावना आहे.

अलिबाग, मुरुड व रोहा या तीन तालुक्याना जोडणारा साळाव पुल वाहतुकीसाठी महत्वाचा समजला जातो. साळाव पुलाचे निर्मितीनंतरच मुरूड तालुका पर्यटन क्षेत्र म्हणून जगाच्या नकाशावर प्रसिध्दीस आला. जर अवजड माल वाहतुकीने पुलास धोका निर्माण झाल्यास पर्यटन पुरते बंद होईल तसेच त्याचे आर्थिक, व्यावसायिक परिणाम तिन्ही तालुक्यात दिसून येतील. साळाव पुलावरून होत असलेली अवजड माल वाहतुक त्वरीत बंद करणेत यावी, अशी मागणी सर्व स्तरातून केली जात आहे.

# नागोठण्यात भक्तीचा महापूर

## जोगेश्वरी माता, भैरवनाथ महाराज पालखी सोहळ्याला प्रारंभ

**नागोठणे : प्रतिनिधी**

चैत्र पौर्णिमेच्या पावन निमित्ताने नागोठणे ग्रामदैवत जोगेश्वरी माता व भैरवनाथ महाराज यांच्या पालखी सोहळ्याला शुक्रवारी (दि. ३) सकाळी उत्साहात प्रारंभ झाला. मंदिरात विधिवत पूजाअर्चा व आरती झाल्यानंतर सकाळी १० वाजता पुजारी मधुकर पोवळे यांच्या हस्ते पालखी मंदिराबाहेर काढण्यात आली.



पालखी सोहळ्यादरम्यान राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांनी पालखीचे दर्शन घेतले. यावेळी राष्ट्रवादीचे नेते नरेंद्र जैन, भाईसाहेब टके, किशोर जैन, विलास चौलकर, संतोष कोळी, बाळासाहेब टके, सचिन कळसकर यांच्यासह कार्यकर्ते व पदाधिकारी तसेच उत्सव समितीचे अध्यक्ष चंद्रकांत ताडकर यांच्यासह पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

पालखी सोहळयात पारंपरिक वाद्य, बेंजो, लेझीम व घोडानाचाच्या तालावर संपूर्ण परिसर दणाणून गेला. ठिकठिकाणी फटाक्यांच्या आतषबाजीत व जल्लोषात पालखीचे स्वागत करण्यात आले. दांडपट्ट्याचे खेळ व महिलांचा उत्स्फूर्त सहभाग हे सोहळ्याचे विशेष आकर्षण ठरले.

ग्रामपंचायतीने काटेकोर पद्धतीने राबविलेल्या स्वच्छता मोहिमेमुळे संपूर्ण शहर चकाचक दिसत असून पालखी सोहळ्यामुळे गावात भक्तीमय वातावरण निर्माण झाले आहे.



**नागोठणे : रायगड जिल्हा परिषदेचे आरोग्य व शिक्षण सभापती वैकुंठ पाटील तसेच शर्मिला पाटील यांनी ग्रामदैवत श्री जोगेश्वरी माता व श्री भैरवनाथ महाराज यांच्या पालखी सोहळ्याला भेट देत दर्शन घेतले आणि नागरिकांना शुभेच्छा दिल्या. यावेळी त्यांचे स्वागत करण्यात आले. सोबत भाजपचे आनंद लाड, सचिन मोदी व ग्रामस्थ उपस्थित होते.**



# बेशिस्त चालकांमुळे माणगाव आणि कोलाड येथील वाहतूक कोंडीत भर

**माणगाव : रामप्रहर वृत्त**

मुंबई–गोवा महामार्गावरील वाहतूक कोंडी ही नित्याचीच बाब ठरली असून बेशिस्त चालकांमुळे या वाहतूक कोंडीत भर पडत असते.

मुंबई–गोवा महार्गाचे काम प्रगतिपथावर असल्याचे दिसत असले, तरी माणगाव येथील वाहतूक कोंडी नित्याचीच बाब आहे. सुटीच्या दिवशी या मार्गावरून प्रवास करणे अतिशय त्रासदायक ठरू लागले आहे. बराच अडकून पडलेल्या गाड्यांमध्ये लहान मुले, महिला आणि ज्येष्ठांचा पाणी, अन्न आणि इंधनाचा प्रश्न निर्माण होतो. या वाहतूक कोंडीत रुग्णवाहिकांना जाण्यासाठीदेखील रस्ता



मोकळा करता येत नाही अशी परिस्थिती निर्माण होत आहे.

बेशिस्त वाहन चालक ओव्हरटेक करताना दिसतात, यात चारचाकी वाहने जास्त प्रमाणात आहेत. हे चालक दुसऱ्या विरुद्ध लेनमध्ये प्रवेश करतात आणि समोरून येणाऱ्या गाडीचा रस्ता बंद करतात. त्यामुळे कारण नसताना दोन्ही बाजूला वाहतूक कोंडी होत आहे.

या बेजबाबदार वाहन चालकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली तर वाहतूक कोंडीला आळा बसू शकतो, असे यप्रवाशांचे म्हणणे आहे. जिल्हा वाहतूक प्रशासन आणि स्थानिक पोलीस प्रशासन यांनी याची दखल घ्यावी, अशी मागणी करण्यात येत आहे.

# ‘अल्काईल अमाइन्स’कडून चौक रुग्णालयाला आरोग्य सुविधा

**रसायनी, मोहोपाडा : प्रतिनिधी**

अल्काईल अमाइन्स केमिकल्स लि. पाताळगंगा यांच्या सौजन्याने सीएसआर निधीमार्फत चौक ग्रामीण रुग्णालयात विविध आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या. २०० बेडशीट, दाताच्या सर्जरीसाठी उपयोगी इन्स्ट्रुमेंट कॅबिनेट, अन्न गरम राहण्यासाठी वॉर्मर ट्रॉली, फ्रिज, ३ बकेट सुविधा, रुग्ण परीक्षण टेबल, ३० गाद्या आणि वॉटर प्युरिफायर, कूलर अशा उपयोगी वस्तू सुपूर्द करण्यात आल्या.

यावेळी अल्काईल अमाइन्स कंपनीचे सिनियर एचआर मॅनेजर मॅथ्यू डीकुन्हा, पाताळगंगा एचआर अर्चना माने, सिनियर ऑफिसर सीएसआर निकिता म्हात्रे, सीएसआर कन्सल्टंट रवी ओंकार, प्रोजेक्ट को–ऑर्डिनेटर सिजो उपस्थित होते.



चौक ग्रामीण रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षक डॉ. सविता कालेल यांनी अल्काईल अमाइन्सचे नेहमीच मिळणाऱ्या सहकार्याबद्दल आभार व्यक्त केले. मॅथ्यू डीकुन्हा यांनी अशा प्रकारच्या आरोग्य सेवेसाठी अल्काईल अमाइन्स कार्यरत राहील याची ग्वाही दिली. या अगोदर अल्काईल अमाइन्सने नूतनीकरण केलेल्या सुसज्ज शस्त्रक्रिया विभागामुळे आणि इतर आरोग्य सुविधांमुळे गरजू रुग्णांना दिलासा मिळाल्याचे डॉ. सविता कालेल यांनी सांगितले.

# गणेश यशवंत वाघरे शाळेचे यश

**माणगाव : प्रतिनिधी**

गणेश यशवंत वाघरे इंग्रजी माध्यम शाळा, माणगाव येथील विद्यार्थ्यांनी द ड्रिम आयोजित राष्ट्रीय स्तरावरील प्रिमियम विविध कला स्पर्धांमध्ये ठसा उमटवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

या स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी रेखांकन, रंगकाम, कार्टून बनवणे, हस्तलेखन, तसेच क्राफ्ट मेकिंग अशा विविध कलाप्रकारांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करत अनेक पुरस्कार पटकावले. स्वरा उदय मोरे (इयत्ता ९वी) रेखांकन व रंगकाम या स्पर्धेत चौथा क्रमांक पटकावत स्मृतिचिन्ह मिळवले. स्वरा प्रदीप गायकवाड (इयत्ता ६वी) कार्टून बनवणे या प्रकारात स्टार अवॉर्ड मिळवत सुवर्णपदक



आणि भेटवस्तू प्राप्त केली. स्मित महेंद्र नाईककर (इयत्ता ६वी) रंग भरणे या प्रकारात गोल्डन अवॉर्ड पटकावला. मृदा सुहास सावंत (इयत्ता ७वी) रंग भरणे स्पर्धेत गोल्डन अवॉर्ड मिळवला.तन्वी राकेश पोवार (इयत्ता ९वी) हस्तलेखनात गोल्डन अवॉर्ड मिळवत आपली सुंदर अक्षरकला सिद्ध केली. श्रावणी विवेक काटोलकर (इयत्ता ८वी) रंग भरणे या प्रकारात गोल्डन अवॉर्ड मिळवला. रोहित सुनील गोळे (इयत्ता ७वी) रंग भरणे स्पर्धेत गोल्डन अवॉर्ड पटकावला. मिताली रघुनाथ जगदाळे (इयत्ता ६वी) हस्तलेखनात गोल्डन अवॉर्ड मिळवला. अनन्या जी. तावडे (इयत्ता ९वी) क्राफ्ट मेकिंगमध्ये गोल्डन अवॉर्ड मिळवत उत्कृष्ट सर्जनशीलता दाखवली. या सर्व विद्यार्थ्यांच्या यशामुळे शाळेचा नावलौकिक उंचावला असून पालक व शिक्षक वर्गात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

विद्यार्थ्यांच्या या उज्ज्वल कामगिरीमागे त्यांची मेहनत, जिद्द आणि शिक्षकांचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले आहे. मुख्याध्यापिका मनिषा मोरे, कलाशिक्षक अनंत सावंत व शिक्षकांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते मैफिल गार्डन रिसॉर्टचे उद्घाटन

**माणगाव : प्रतिनिधी**

डॉ.जे.एम. म्हात्रे व परिवाराने माणगाव तालुक्यात साकारलेला मैफिल गार्डन रिसॉर्टचा सुंदरसा परिसर मनाला आनंद देणारा असल्याचे गौरोदगार राज्याच्या महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे यांनी काढले.

डॉ.जे.एम. म्हात्रे परिवार फ्रेंड्स ग्रुप डोंबिवली यांनी ग्रामीण भागातील लोकांना रोजच्या धकाधकीच्या जीवनातून थोडासा विरंगुळा मिळावा व त्यातून त्यांना मनसोक्त आनंद मिळावा हा उद्देश नजरेसमोर ठेऊन मुंबई–गोवा महामार्गापासून जवळच्या अंतरावर माणगाव तालुक्यातील खरवली–उसरफाटा–सालेगाव हॉटेल ओपन अंब्रेला समोर याठिकाणी नयनरम्य व आकर्षक



असे मैफिल गार्डन रिसॉर्ट साकारले असून या रिसॉर्टच्या माणगाव तालुक्याच्या वैभवात आणखी एक निश्चितच भर पडली आहे.

या रिसॉर्टचे उदघाटन रामनवमीच्या शुभमुहूर्तावर मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते उत्साहात करण्यात आले. या कार्यक्रमास राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश युवक सचिव दीपक जाधव, माणगाव पंचायत समिती सदस्य संगीता बक्कम, ज्येष्ठ नागरिक सुरेश चव्हाण, श्री.खरंगटे, राष्ट्रवादी काँग्रेसच्या सोशल मिडीया प्रमुख किशोरी हिरवे आदी उपस्थित होते.

यावेळी आलेल्या सर्व मान्यवरांचे जे.एम.म्हात्रे यांनी स्वागत केले. या रिसॉर्टच्या उदघाटनप्रसंगी कार्यक्रमात बोलताना मंत्री आदिती तटकरे पुढे म्हणाल्या की, १४ एकर प्रशस्त जागेत हे मैफिल गार्डन रिसॉर्ट आकर्षक स्वरूपात उभारण्यात आले आहे. या रिसॉर्टमध्ये क्रीडा संकुल असल्याने या सर्व परिसरातील तरुणांना खेळाचा मनमुराद आनंद लुटता येणार आहे. शिवाय याठिकाणी लग्न समारंभासाठी हॉल, हॉटेल, कॉन्फरन्स हॉल, गार्डन रिसॉर्ट, बँक्वेट हॉल अशा अनेक सुविधा आहेत. या रिसॉर्टमुळे परिसरातील तरुणांना निश्चितपणे रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील.

रिसॉर्ट मुंबई–गोवा महामार्गाच्या जवळच्या अंतरावर असून या महामार्गाचे काम लवकरच पूर्ण होईल तसेच बायपासचे काम जुलै अखेरपर्यंत पूर्ण झाल्यावर या सर्व परिसरात पर्यटकांची संख्या अधिक प्रमाणात वाढणार आहे. त्यामुळे अशा प्रकारच्या रिसॉर्टमध्ये आनंद घेण्यासाठी पर्यटकांची संख्या दिवसेंदिवस वाढेल असे सांगून त्यांनी डॉ. म्हात्रे व परिवाराला पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या

आपल्या मनोगतात डॉ. म्हात्रे यांनी या रिसॉर्टमध्ये गोरगरीब नागरिकांचे जे कार्यक्रम होतील ते कमीत कमी खर्चामध्ये घेण्यासाठी मी सहकार्य करेन, अशी ग्वाही दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तथा उपस्थितांचे आभार प्राची झेमसे यांनी व्यक्त केले.

# चौलमध्ये सुक्या चाऱ्याची भीषण टंचाई

## पशुपालक अडचणीत

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

अलिबाग तालुक्याला लाभलेला विस्तीर्ण समुद्रकिनारा आणि पर्यटन व्यवसायामुळे ओळख असली तरी येथील अनेक कुटुंबांचे प्रमुख उत्पन्न स्रोत शेती आणि पशुपालन आहे, मात्र मागील काही दिवसांपासून सुक्या चाऱ्याच्या भीषण टंचाईमुळे पशुपालकांवर मोठे संकट ओढवले आहे.

सतत बदलणारे वातावरण, अवकाळी पाऊस आणि अनियमित हवामानामुळे चाऱ्याचे उत्पादन मोठ्या प्रमाणात घटले आहे. परिणामी सध्या सुक्या चाऱ्याची तीव्र कमतरता जाणवत असून पशुपालक चिंताग्रस्त झाले आहेत.

पुरेसा व पौष्टिक चारा उपलब्ध नसल्याने जनावरांच्या आरोग्यावर परिणाम होत



असून त्याचा थेट परिणाम दूध उत्पादनावर होताना दिसत आहे. दुधाचे प्रमाण लक्षणीयरीत्या घटून पशुपालकांचे आर्थिक गणित कोलमडले आहे. एकीकडे दुधाला मिळणारा दर आणि दुसरीकडे वाढता खर्च यांचा ताळमेळ बसवणे कठीण बनले आहे.

या परिस्थितीत शासनाने तातडीने सुक्या चाऱ्याच्या उपलब्धतेसाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी पशुपालकांकडून केली जात आहे; अन्यथा येणाऱ्या काळात पशुपालन व्यवसाय मोठ्या संकटात सापडण्याची भीती व्यक्त होत आहे.

# खेड येथे शिवसेनेचे नवनिर्वाचित रायगड लोकसभा संपर्कप्रमुख अनिल नवगणे यांचा सत्कार

**माणगाव : प्रतिनिधी**

रायगड–रत्नागिरी लोकसभा मतदारसंघाच्या शिवसेना संपर्कप्रमुखपदी नियुक्ती झालेले रायगड जिल्ह्याच्या माणगाव तालुक्यातील इंदापूर गावचे रहिवासी अनिल नवगणे यांचा रत्नागिरी जिल्ह्यातील खेड जामगा येथे जेष्ठ नेते तथा माजी मंत्री रामदास कदम, राज्याचे गृहमंत्री योगेश कदम यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.



यावेळी माजी आमदार संजय कदम, शिवसेना रत्नागिरी जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण, जिल्हा परिषद सदस्य अण्णासाहेब कदम, खेड तालुकाप्रमुख आणि जिल्हा परिषद सदस्य शशिकांत धाडवे, शशिकांत वाघे, खेड पंचायत समिती अध्यक्ष, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य तसेच शिवसेना पदाधिकारी उपस्थित होते.

सर्वांनी नवनियुक्त शिवसेना संपर्कप्रमुख अनिल नवगणे यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील सामाजिक व राजकीय वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. स्थानिक कायकर्ते उपस्थित होते.

# कोर्लई माउंट कार्मेल चर्च येथे गुड फ्रायडे

**रेवदंडा : प्रतिनिधी**

कोर्लईमधील माउंट कार्मेल चर्च येथे गुड फ्रायडे दिवस साजरा करण्यात आला. यावेळी मोठ्या संख्येने ख्रिश्चन बांधव व भगिनी माउंट कार्मेल चर्च येथे उपस्थित होते.

यावेळी कोर्लई माउंट कार्मेल चर्चचे फादर यांच्या मार्गदर्शनाखाली चर्चमध्ये विशेष प्रार्थना, उपसास आणि येशूच्या वधस्तंभाच्या यातनांचे स्मरण केले गेले. येशू ख्रिस्ताच्या बलिदानाची आठवण म्हणून गुड फ्रायडे अत्यंत शोकमग्न वातावरणात पाळला जातो. गुड फ्रायडे हा दिवस त्याग व क्षमेचे प्रतीक मानला जातो.

कोर्लई येथे गुड फ्रायडे साजरा केला जातो. ख्रिश्चन धर्मामध्ये या दिवसाला विशेष महत्व आहे. हा दिवस कोर्लई ख्रिश्चन पाडयात वेगळ्या पद्धतीने साजरा करण्यात आला.



# गोरेगाव महाविद्यालयात वार्षिक पारितोषिक वितरण

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुका एज्युकेशन सोसायटीचे दोशी वकील आर्ट्स कॉलेज अँड जी.सी.यू.बी. सायन्स अँड कॉमर्स कॉलेज, गोरेगाव येथे वार्षिक पारितोषिक वितरण व पदवीदान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा सोहळा मंगळवार, दिनांक ७ एप्रिल २०२६ रोजी रुक्मिणीबाई मंगल कार्यालय, गोरेगाव येथे संपन्न होणार आहे.

या सोहळ्यात विद्यार्थ्यांना पारितोषिके व पदवी प्रदान करण्यात येणार असून कार्यक्रम संस्थेचे विश्वस्त व चेअरमन श्रीनिवास बेंडखळे यांच्या हस्ते व अध्यक्षतेखाली पार पडणार आहे. तसेच संस्थेचे अध्यक्ष विजयकुमार खुळे, विश्वस्त दिलीप शेठ, उपाध्यक्ष अरुणा शेठ, व्हाईस चेअरमन विनायक हरी मोने, खजिनदार विवेक मणिलाल दोशी, सचिव प्रसाद जनार्दन मराठे तसेच संस्थेच्या स्थायी समितीचे सदस्य उपस्थित राहणार आहेत.

महाविद्यालयाच्या वतीने आयोजित या कार्यक्रमास सर्व विद्यार्थी, माजी विद्यार्थी व पालकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी केले आहे.

# पंजाबकडून चेन्नईला पराभवाचा धक्का



**चेन्नई : वृत्तसंस्था**

पहिल्या चारही आघाडीवीरांनी किमान ३५ धावांचे योगदान दिल्यानंतर पंजाब किंग्जने येथील आयपीएल साखळी सामन्यात बलाढ्य चेन्नई सुपर किंग्जविरुद्ध स्वप्नवत विजय मिळवला. विजयासाठी २१० धावांचे आव्हान असताना प्रियांश आर्य (३९), प्रभसिमरन सिंग (४३), कूपर कॉनोली (३६) व कर्णधार श्रेयस अय्यर (२९ चेंडूंत ५०) यांनी आक्रमक फलंदाजी करत विजय दृष्टिक्षेपात आणला.

युवा फलंदाज आयुष म्हात्रेने अवघ्या ४३ चेंडूंत ७३ धावांची आतषबाजी केल्यानंतर चेन्नई सुपर किंग्जने २० षटकांत पाच बाद २०९ धावांपर्यंत मजल मारली होती. आयुषला शिवम दुबे (२७ चेंडूंत ४५) व सरफराज खान (१२ चेंडूंत ३२) यांनी उत्तम साथ दिली, मात्र यानंतरही चेन्नईला पराभवाचा सामना करावा लागला.

प्रारंभी पंजाबने नाणेफेक जिंकल्यानंतर चेन्नईला प्रथम फलंदाजीला पाचारण केले होते. सलामीवीर संजू सॅमसन अवघ्या ७ धावांवर बाद झाल्याने चेन्नईला पहिला धक्का बसला. कर्णधार ऋतुराज गायकवाड व आयुष म्हात्रे यांनी मात्र आणखी पडझड होऊ न देता धावफलक सातत्याने हलता ठेवण्यावर भर दिला.

आयुष म्हात्रे अधिक आक्रमक पवित्र्यात होता. त्याने ४३ चेंडूंत सहा चौकार व पाच षटकारांसह ७३ धावांची लक्षवेधी खेळी साकारली. त्याने पंजाबच्या जवळपास प्रत्येक गोलंदाजाचा उत्तम समाचार घेतला. ऋतुराज २२ चेंडूंत २८ धावांवर चहलच्या गोलंदाजीवर बाद झाला. त्याच्या खेळीत दोन चौकारांचा समावेश होता.

सॅमसन बाद झाला, त्यावेळी संघाच्या खात्यावर अवघ्या १४ धावा होत्या, मात्र त्यानंतर आयुष व ऋतुराज यांनी दुसऱ्या गड्यासाठी ९६ धावांची भागीदारी साकारत संघाला सुस्थितीत आणण्याचा पुरेपूर प्रयत्न केला. अंतिमतः चहलने ऋतुराजला वधेराकरवी झेलबाद करत ही जोडी फोडली. ऋतुराज बाद झाल्यानंतर आयुषही लवकरच पॅव्हेलियनमध्ये परतला.

प्रत्युत्तरात पंजाबकडून आघाडीच्या फलंदाजांनी योगदान दिल्यानंतर शशांक सिंग व मार्कस स्टोईनिस यांनी १८.४ षटकांत विजयाचे सोपस्कार पूर्ण केले. शेवटच्या षटकांमध्ये चेन्नईने लागोपाठ दोन विकेट्स घेऊन पुनरागमन केले, पण पंजाबने हा सामना पाच गडी राखून जिंकून सलग दुसऱ्या विजयाची नोंद केली आहे.



## राज्यस्तरीय वॉटर पोलो स्पर्धेत नागोठणे स्कूलला सुवर्णपदक

**पाली : प्रतिनिधी**

रिलायन्स फाउंडेशन स्कूल (मराठी माध्यम) नागोठणेच्या विद्यार्थ्यांनी २०२५-२६ या वर्षातील राज्यस्तरीय वॉटर पोलो स्पर्धेत सुवर्णपदक (प्रथम क्रमांक) पटकावत नावलौकिक संपादन केला आहे. ही स्पर्धा पुणे येथील बालेवाडी क्रीडा संकुलात पार पडली.

नागोठण्याच्या संघाने कठोर सराव, उत्कृष्ट संघभावना आणि जिद्दीच्या जोरावर संघाने संपूर्ण स्पर्धेत वर्चस्व राखत प्रत्येक सामन्यात प्रभावी खेळ सादर केला. विजेत्या संघात वेद कुथे, मनन घासे, मयूष ठाकूर, श्रावण कुथे, श्लोक पाटील, आर्यन पाटील, सर्वेश पाटील, हर्ष दैंगडे, श्रावण इंद्रे, जय कोळी, प्रजोत शिर्के, हर्ष ठाकूर व कृतक लाडगे यांचा समावेश आहे.

या संघाचे प्रशिक्षक सुनील पवार आणि संघ व्यवस्थापक म्हणून तेजस भैरवकर यांचे मार्गदर्शन लाभले. विजेतेपदाबद्दल सर्व खेळाडू, प्रशिक्षक आणि शाळा व्यवस्थापनाचे अभिनंदन होत आहे.

## राष्ट्रीय तायक्वॉन्डो पंच सेमिनार व परीक्षेसाठी सुभाष पाटील परीक्षकपदी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

तायक्वॉन्डो फेडरेशन ऑफ इंडिया आणि तायक्वॉन्डो असोसिएशन ऑफ उत्तराखंडमार्फत




डेहराडून येथे १० ते १२ एप्रिलदरम्यान राष्ट्रीय पंच सेमिनार व राष्ट्रीय पंच परीक्षा होणार आहे. यासाठी परीक्षक म्हणून रायगडचे सुपूत्र आंतरराष्ट्रीय पंच व प्रशिक्षक सुभाष पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

सुभाष पाटील हे सातवी डिग्री ब्लॅक बेल्ट व आंतरराष्ट्रीय पंच आहेत. त्यांनी आतापर्यंत अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये पंच म्हणून उत्कृष्ट कामगिरी केली आहे तसेच विविध देशात जाऊन सेमिनारमध्ये सहभाग घेतला आहे. आता ते स्वतः भारतात त्याचा प्रसार व प्रचार करण्यासाठी अनेक राज्यांमध्ये सेमिनार घेत आहेत.

सुभाष पाटील हे राष्ट्रीय पंच सेमिनार व परीक्षेसाठी ९ एप्रिल रोजी डेहराडून येथे रवाना होणार आहेत. त्यांना या स्पर्धेसाठी तायक्वॉन्डो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र, रायगड तायक्वॉन्डो असोसिएशनचे पदाधिकारी, आमदार प्रशांत ठाकूर, महापौर नितीन पाटील, नगरसेवक परेश ठाकूर व इतर मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या.

## श्रेयस अय्यरने पुन्हा केली तीच चूक!

■ षटकांची गती कमी राखल्यामुळे बसला दंड



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयपीएल २०२६मध्ये पंजाब किंग्सने विजयाचा धडाका लावला असला, तरी संघाचा कर्णधार श्रेयस अय्यरसाठी चिंतेची बाब समोर आली आहे. चेन्नई सुपर किंग्सविरुद्धच्या रोमहर्षक विजयानंतर षटकांची गती कमी राखल्यामुळे बीसीसीआयने अय्यरवर २४ लाखांचा दंड ठोठावला आहे. विशेष म्हणजे, त्याच्याकडून या हंगामात सलग दुसऱ्यांदा ही चूक झाल्याने कर्णधारासह संपूर्ण संघाला याचा फटका बसला आहे.

चेन्नईच्या एम.ए. चिदंबरम स्टेडियमवर पंजाब किंग्स आणि चेन्नई सुपर किंग्स यांच्यात सामना झाला. या सामन्यात पंजाबने २१० धावांचे मोठे आव्हान यशस्वीपणे पार करत विजय मिळवला, मात्र गोलंदाजी करताना पंजाबने निर्धारित वेळेत षटके पूर्ण केली नाहीत. आयपीएलच्या आचारसंहितेनुसार हे 'ओव्हर रेट' नियमाचे उल्लंघन मानले जाते.

श्रेयस अय्यरने या हंगामातील पहिल्या सामन्यात गुजरात टायटन्सविरुद्धही हीच चूक केली होती. तेव्हा त्याला १२ लाख रुपयांचा दंड करण्यात आला होता. आयपीएलच्या नियमांनुसार एकाच हंगामात दुसऱ्यांदा ही चूक झाल्यास दंडाची रक्कम दुप्पट केली जाते. त्यामुळे आता अय्यरला २४ लाखांचा दंड ठोठवण्यात आला आहे.

**संघालाही बसला फटका**

नियमानुसार सलग दुसऱ्यांदा चूक झाल्यास केवळ कर्णधारावरच नाही, तर प्लेइंग इलेव्हनमधील इतर खेळाडूंवरही दंड आकारला जातो. त्यानुसार प्रत्येक खेळाडूला त्यांच्या मॅच फीच्या २५ टक्के किंवा सहा लाख रुपये (जे कमी असेल ते) दंड म्हणून भरावे लागणार आहेत. तिसऱ्यांदा अशीच चूक झाल्यास कर्णधारावर एका सामन्याच्या बंदीची कारवाईदेखील होऊ शकते, ज्यामुळे पंजाबच्या पुढील मोहिमेवर परिणाम होण्याची शक्यता आहे.

## आयुष म्हात्रेने मोडला सुरेश रैनाचा विक्रम

### 'चेपॉक'वर अर्धशतक करणारा ठरला सर्वात युवा फलंदाज

**मुंबई : प्रतिनिधी**



चेन्नईतील चेपॉकच्या मैदानावर झालेल्या पंजाब किंग्जविरुद्धच्या सामन्यात चेन्नई सुपर किंग्जच्या आयुष म्हात्रे याच्या फलंदाजीचा बोलबाला पहायला मिळाला. तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीला आलेल्या आयुषने ४३ चेंडूंचा सामना करत १६९.७७च्या स्ट्राईक रेटने फलंदाजी करताना सहा चौकार आणि पाच षटकारांचा सामना करत ७३ धावांची खेळी केली. यादरम्यान त्याने माजी फलंदाज सुरेश रैनाचा मोठा विक्रम मोडला आहे.

या सामन्यातील पहिल्या डावात फलंदाजी करण्यासाठी आलेल्या चेन्नई सुपर किंग्ज संघाला सुरुवातीलाच मोठा धक्का बसला होता. संजू सॅमसन अवघ्या सात धावा करून माघारी परतला. त्यानंतर आयुष म्हात्रे आणि कर्णधार ऋतुराज गायकवाडने मिळून संघाचा डाव सांभाळला.

आयुष म्हात्रेचा हा चेन्नई सुपर किंग्ज संघासाठी दुसराच हंगाम आहे. यादरम्यान चेन्नईसाठी चेपॉकच्या मैदानावर खेळताना त्याने मोठा रेकॉर्ड आपल्या नावावर केला. आयुष हा चेपॉकच्या मैदानावर अर्धशतकी खेळी करणारा सर्वात युवा फलंदाज ठरला आहे. आयुषने हा कारनामा वयाच्या १८व्या वर्षी (१८ वर्ष २६१ दिवस) केला आहे. याआधी चेपॉकच्या मैदानावर अर्धशतक झळकावणाऱ्या सर्वात युवा फलंदाजाचा रेकॉर्ड हा सुरेश रैनाच्या नावावर होता. रैनाने वयाच्या २१व्या वर्षी (२१ वर्ष १४८ दिवस) चेपॉकच्या मैदानावर खेळताना अर्धशतक झळकावले होते.

## वैभव सूर्यवंशीच्या 'त्या' कृतीचे होतेय कौतुक

**अहमदाबाद : वृत्तसंस्था**

आयपीएल २०२६ची सुरुवात वैभव सूर्यवंशीने एकदम दणक्यात केली आहे. राजस्थान रॉयल्ससाठीच्या आपल्या पहिल्याच सामन्यात १५ वर्षीय वैभवने १६ चेंडूत अर्धशतक झळकावले. यानंतर पुढील सामन्यापूर्वी वैभव हा गुजरात टायटन्स संघाचा कोच आशिष नेहराच्या पाया पडतानाचा व्हिडीओ व्हायरल होत आहे.

सामन्याच्या एक दिवस आधी दोन्ही संघ अहमदाबादमधील नरेंद्र मोदी स्टेडियमवर दोन्ही संघ एकत्र सराव करत होते. वैभव सूर्यवंशीदेखील मैदानावर होता. गुजरात टायटन्सचे प्रशिक्षक आशिष नेहरा यांच्या नजरेस हा तरुण फलंदाज पडताच वैभव त्यांची भेट घेण्यासाठी पुढे गेला. नेहराला जवळ येताना पाहून वैभव थेट त्यांच्याजवळ गेला आणि त्याने त्यांच्या पायांना स्पर्श करून आशीर्वाद घेतला. यानंतर आशिषदेखील त्याला थांबवले आणि त्याला शुभेच्छा दिल्या.



वर्ष २१ वे



ज्ञानराज माझी योग्यांची माऊली।। जेणे निगमवल्ली प्रगट केली।।


विठ्ठल रुख्मीणी तुम्ही अखंड आणा ध्यानी।।


सर्व मंगल मांगल्ये। शिवेसर्वार्थ साधिके शरण्ये त्र्यंबकेगौरी। नारायणी नमोस्तुते।।


तुकाराम तुकाराम नाम घेता कापे यम।।

**श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पुरस्कृत**
**माऊली हरिपाठ मंडळ, गव्हाण-कोपर आयोजित**

वै. ह.भ.प. अप्पा माऊली (पनवेल) यांच्या कृपाशिर्वादाने
ह.भ.प. बानुबाई (खारकोपर) यांच्या उपस्थितीत.





**अखंड हरिनाम सप्ताह**

ग्रंथराज श्री ज्ञानेश्वरी सामुदायिक पारायण सोहळा

व्यासपीठ चालक - ह.भ.प. शिवाजी महाराज पाटणकर (आळंदी-देवाची)

प्रारंभ: चैत्र शुद्ध १३, मंगळवार, दि. ३१/३/२०२६

देवीचा अभिषेक सकाळी ८.०० वाजता

सांगता: चैत्र कृ. ५, मंगळवार, दि. ७/४/२०२६

सर्व भाविकांना कळविण्यात आनंद होत आहे की, सालाबादप्रमाणे माऊली हरिपाठ मंडळ, गव्हाण तर्फे स्वा. सु.ह.भ.प. वै. सदानंद गुरुजी (देवाची आळंदी) यांचे परमशिष्य ह.भ.प. शिवाजी महाराज पाटणकर (देवाची आळंदी) यांच्या प्रेरणेने ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा चैत्र शुद्ध १३, मंगळवार दि. ३१/०३/२०२६ ते चैत्र कृ. ५ मंगळवार दि. ७/०४/२०२६ रोजी संपन्न होत आहे. तरी कृपया सर्व भाविकांनी ह्या पर्वणीचा लाभ घ्यावा, ही नम्र विनंती.

**दैनंदिन कार्यक्रम**

पहाटे ४.०० ते ६.०० वा. - काकडा
सकाळी ८.०० ते १२.३० वा. - ज्ञानेश्वरी पारायण
सायं. ४.०० ते ५.०० वा. - प्रवचन
सायं. ६.०० ते ७.०० वा. - सामुदायिक हरिपाठ
रात्री ०७.३० ते ०९.३० वा. - कीर्तन

**रविवार, दि. ०५/०४/२०२६**

प्रवचन - ह.भ.प. रोशन महाराज ठाकूर (बेलपाडा)
हरिपाठ - श्री कृष्ण हरिपाठ मंडळ, बेलपाडा
किर्तनकार - ह.भ.प. भगिरथ महाराज काळे (सिन्नर)
स्मरणार्थ - कै. शिवाजी रघुनाथ देशमुख
सौजन्य - श्री. किरण शिवाजी देशमुख (गव्हाण)

**सोमवार, दि. ०६/४/२०२६**

सकाळी ८.३० वा - ग्रंथराज ज्ञानेश्वरी पुजन
सायं ४ ते ५ वा - दिंडी सोहळा व दिपोत्सव सोहळा
सामुदायीक हरिपाठ
किर्तनकार - ह.भ.प. डॉ. चारुदत्त महाराज आफळे (पुणे)
स्मरणार्थ - कै. यमुना वसंतशेठ पाटील
सौजन्य - ह.भ.प. वसंतशेठ हरि पाटील (खारकोपर)

काल्याचे कीर्तन: मंगळवार, दि. ०७/०४/२०२६ रोजी सकाळी १० ते १२ वा. ह.भ.प. श्रावण महाराज अहिरे (नाशिक),
सौजन्य : श्री. महेंद्रशेठ तुकाराम घरत
किर्तनसाथ : पनवेल-उरण वारकरी सांप्रदाय

ठिकाण - श्री शांतादेवी मंदीर, गव्हाण, ता. पनवेल, जि. रायगड



सौजन्य : हभप अनंतशेठ पाटील (अध्यक्ष, भाजपा मजूर सेल महाराष्ट्र राज्य)



सौजन्य : घनश्याम पाटील, संतोष पाटील



सौजन्य : चारुशिला घरत (माजी उपमहापौर)


दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com